cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४३ | बुधवार दि.३१ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

**बळीराजाने किती किंमत मोजायचीय !**

चंद्रपूरमधील एका शेतकऱ्याला खासगी सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी स्वतःची किडनी विकावी लागली. हे प्रकरण उघड होताच राज्यात खळबळ उडाली. लाखांचा पोशिंदा असे ज्याचे वर्णन समाज करतो, त्याला मात्र त्याच्या पोटाची खळगी भरण्यासाठी असे पाऊल उचलावे लागले.

# शासनाकडून कर्जमाफीची तयारी सुरू

## थकित, नियमित कर्जदारांची मागवली माहिती, समितीच्या अहवालानंतर निकष ठरणार

**पुणे । प्रतिनिधी**

**प्रस्तावित शेतकरी कर्जमाफीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जिल्हा बँकांसह सहकारी संस्थांकडून थकबाकीदार, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची सविस्तर माहिती मागवली आहे. सहकार आयुक्तांनी जिल्हा बँकांना त्याबाबत आदेश दिले असून, विकास सेवा सोसायट्यांमार्फत माहिती संकलनाचे काम सुरू झाले आहे.**



विधानसभा निवडणुकीदरम्यान महायुतीने शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. मात्र सत्ता स्थापनेनंतर ठोस निर्णय न झाल्याने शेतकरी संघटनांनी आंदोलन केले. माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात आंदोलनानंतर मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीबाबत सकारात्मक भूमिका घेतली. त्यासाठी समिती नेमली आहे. एप्रिल–२०२६ मध्ये अहवाल अपेक्षित आहे. त्यानंतर जून २०२६ पूर्वी निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. त्यामुळे कर्जमाफी निश्चित होईल, असा विश्वास निर्माण झाला आहे. काही ठिकाणी कर्जवसुलीवर परिणाम होऊन जिल्हा बँका, सहकारी संस्थांवर आर्थिक ताण आहे. कर्जमाफीपूर्वी पात्रतेचे स्पष्ट निकष जाहीर करावेत, अशी मागणी होत असली तरी शासनाची अंतिम भूमिका समितीच्या अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. अल्प, मध्यम, दीर्घ मुदतीच्या कर्जासंदर्भातील डेटा जून २०२५ पर्यंतच्या स्थितीनुसार सादर करावा, असे आदेश आहेत. या अनुषंगाने २०२० ते जून २५ या कालावधीत सलग पाच वर्षे नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांची स्वतंत्र माहितीही शासनाकडे तातडीने पाठवावी लागणार आहे. दरम्यान, शासनाने मागवलेल्या माहितीत थकबाकीदारांची जून २०२५ मधील स्थिती, तसेच सप्टेंबर २०२५ मधील अद्ययावत तपशीलही समाविष्ट आहे. त्यामुळे ▶▶ पान २ वर

### परभणी, नांदेड जिल्ह्यातील अतिवृष्टीत गावांसाठी निधी मंजूर

अतिवृष्टी व पुरामुळे बाधित होऊन पुनर्वसित करण्यात आलेल्या गावांमधील नागरी सुविधा कामांची प्रलंबित देयके अदा करण्यासाठी राज्य सरकारने सोमवारी (दि.२९) स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे परभणी व नांदेड जिल्ह्यातील विविध गावांसाठी एकूण ४ कोटींपेक्षा अधिक निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे. यामध्ये जिंतूर तालुक्यासाठी कौडगाव बु. या गावासाठी ६१ लाख ५३ हजार ८७७, लोहा तालुक्यातील येळी गावांसाठी १ कोटी ९९ लाख ९० हजार रुपये, तर नांदेड जिल्ह्यातील खडकत या गावासाठी १ कोटी ४० लाख रुपये निधी देण्यात आला आहे.

### थोडक्यात...

**१५ जानेवारीला महाराष्ट्रात पगारी सुट्टी जाहीर**

मुंबई : राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नोकरदार वर्गासाठी एक अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. येत्या १५ जानेवारी रोजी मुंबई आणि ठाण्यासह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांमध्ये सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदान पार पडणार आहे. या लोकशाहीच्या उत्सवात सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क निर्भयपणे आणि उत्साहाने बजावता यावा, यासाठी राज्य सरकारने या दिवशी सर्व नोकरदारांना 'भरपगारी सुट्टी' जाहीर केली आहे. सरकारने जारी केलेल्या या आदेशानुसार, सर्व सरकारी आणि निमसरकारी कार्यालयांसह खासगी कंपन्या, आयटी पार्क्स, व्यापारी दुकाने, हॉटेल्स, शॉपिंग मॉल्स आणि औद्योगिक उपक्रमांमधील कामगारांना ही सुट्टी मिळणार आहे. ज्या आस्थापनांमध्ये कामाच्या स्वरूपामुळे पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसेल, तिथे किमान दोन ते तीन तासांची विशेष सवलत देणे मालकांसाठी अनिवार्य करण्यात आले आहे.

**सोलापुरात एबी फॉर्ममुळे भाजप कार्यकर्त्यांत राडा**

सोलापूरः राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सोलापूरमध्ये गोंधळ पाहायला मिळाला. भाजपचे एबी फॉर्म वेळेत न पोहोचल्याने आणि शेवटच्या क्षणी ते दाखल करण्यावरून शिंदे यांची शिवसेना व काँग्रेसचे कार्यकर्ते आक्रमक झाले. या कार्यकर्त्यांनी भाजप पदाधिकाऱ्यांची वाट अडवत जोरदार घोषणाबाजी केल्याने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अर्ज भरण्याची अंतिम मुदत दुपारी ३ वाजेपर्यंत होती. मात्र, भाजपचे अधिकृत उमेदवार ठरवणारे एबी फॉर्म वेळेत निवडणूक कार्यालयात पोहोचू शकले नाहीत. अगदी शेवटच्या क्षणी भाजप शहराध्यक्ष आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी हे एबी फॉर्म घेऊन कार्यालयात दाखल झाले. यावेळी वेळ संपल्याचा दावा करत उपस्थित शिंदे सेना आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला.

**मुंबई मराठी पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर**

मुंबईः ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक दिलीप ठाकूर यांच्यासह तुळशीदास भोईटे, अशोक अडसूळ, सचिन लुंगसे, विवेक दिवाकर, अविनाश कोल्हे व राजेश माळकर यांची यंदाच्या मुंबई मराठी पत्रकार संघाच्या विविध पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली. दरवर्षी पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनी ६ जानेवारीला या पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. १० हजार रुपये, गौरव चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. यंदा ज्येष्ठ पत्रकार लेखक पी. साईनाथ यांच्या हस्ते सायंकाळी ६ वा. पत्रकार संघाच्या सभागृहात पुरस्कारांचे वितरण करण्यात येईल, अशी माहिती संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी दिली. यंदा पहिल्यांदाच सिने पत्रकार व व्हिडीओ जर्नालिस्टसाठी संघातर्फे पुरस्कार सुरू करण्यात आला आहे.

**अश्लील मजकुरांवर तात्काळ कारवाई होणार**

नवी दिल्ली : सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वाढत्या अश्लील कंटेन्ट आणि आक्षेपार्ह मजकुराबाबत केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम आणि एक्स (पूर्वीचे ट्विटर) यांसारख्या मोठ्या सोशल मीडिया कंपन्यांना केंद्र सरकारने स्पष्ट शब्दांत ताकीद दिली असून, अश्लील मजकुरावर तातडीने कारवाई न केल्यास गंभीर कायदेशीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा सरकारने दिला आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने (इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय) जारी केलेल्या ताज्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अश्लील, लहान मुलांसाठी हानिकारक (पीडोफिलिक) आणि बेकायदेशीर मजकूर पसरत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

## राज्यात १४ ठिकाणी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेची युती तुटली

**मुंबई । प्रतिनिधी**

महायुतीमधील जागावाटपावरून भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मोठी रस्सीखेच पाहायला मिळाली. काही महानगरपालिकांमध्ये भाजपला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळत असल्याने पक्षाने आक्रमक भूमिका घेतली. तर काही ठिकाणी शिंदे गटाने युती करण्यास स्पष्ट नकार दिला. स्थानिक राजकीय गणिते आणि परिस्थिती लक्षात घेता दोन्ही पक्षांनी काही ठिकाणी स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या



पार्श्वभूमीवर राज्यातील एकूण १४ महानगरपालिकांमध्ये भाजप आणि शिंदे गटातील युती तुटली आहे. पुणे, पिंपरी–चिंचवड, नाशिक, नांदेड, अमरावती, मालेगाव, अकोला, मीरा–भाईंदर, नवी मुंबई, धुळे, उल्हासनगर, सांगली, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या महापालिकांमध्ये दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे या शहरांमध्ये तिरंगी किंवा बहुरंगी लढती रंगण्याची शक्यता आहे.

राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांमुळे राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने सर्वच पक्षांमध्ये जोरदार हालचाली पाहायला मिळाल्या. काही इच्छुकांना पक्षाकडून उमेदवारी मिळाल्याने ▶▶ पान २ वर

## नववर्षात ८ वा वेतन आयोग लागू




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**केंद्र सरकारने ८ व्या वेतन आयोगाला अधिकृत मंजुरी दिली असून या आयोगाच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारकांना (पेन्शनर्स) तात्काळ वाढीव पगार मिळणार नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. आयोगाच्या शिफारसी लागू होण्यासाठी अजून वेळ लागणार आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने ८ व्या वेतन आयोगाला मंजुरी दिल्यानंतर लाखो कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, अनेक दिवसांपासून पगारवाढीची अपेक्षा असलेल्या कर्मचाऱ्यांना लगेचच त्याचा फायदा मिळणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. हा आयोग केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते आणि पेन्शन यांचा सखोल आढावा घेऊन सरकारला शिफारसी सादर करणार आहे. ▶▶ पान २ वर

## एलपीजी सबसिडी बंद होणार?

### केंद्र सरकार मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत!

**दिल्ली । वृत्तसंस्था**


केंद्र सरकार एलपीजी सबसिडीबाबत मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. एलपीजीच्या सबसिडीच्या हिशोबाबबत नव्याने विचार केला जाऊ शकतो. कारण, सरकारी मालकीच्या तेल कंपन्यांनी गेल्या महिन्यात अमेरिकन निर्यातदारांसोबत वार्षिक पुरवठा करारांवर स्वाक्षरी केली असून, त्याचा परिणाम म्हणून सरकार सबसिडी बंदचा निर्णय घेण्याची शक्यता आहे.

आतापर्यंत, सबसिडीची गणना सौदी



कॉन्ट्रॅक्ट प्राइस (सीपी) वर आधारित केली जात होती, जो पश्चिम आशियातील एलपीजी पुरवठ्यासाठी एक मानक दर होता. तर, सरकारी मालकीच्या तेल कंपनीच्या ▶▶ पान २ वर

## सीईटीच्या नोंदणीला १ जानेवारीपासून सुरूवात




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) आगामी २०२६–२७ या शैक्षणिक वर्षाच्या सामाईक प्रवेश परीक्षांसाठी नोंदणीला सुरुवात १ जानेवारीपासून करण्यात येणार आहे. प्रवेश परीक्षांच्या संकेतस्थळाच्या चाचण्या सुरू असून, त्या पूर्ण होताच नोंदणीला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी दिली.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून तंत्रशिक्षण, उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आयुष शिक्षण, कृषी शिक्षण व कला शिक्षण या सहा विभागांतर्गत एकूण २० विविध व्यावसायिक ▶▶ पान २ वर

**» असे आहे वेळापत्रक...**

इंजिनिअरिंग, फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी पीसीएम ग्रुपची एमएचटी सीईटीची पहिली प्रवेश परीक्षा ११ एप्रिल ते १९ एप्रिल दरम्यान, तर दुसरी प्रवेश परीक्षा १४ मे ते १७ मे दरम्यान होणार आहे. एमबीए / एमएमएस परीक्षा ६ एप्रिल ते ८ एप्रिल दरम्यान, तर दुसरी प्रवेश परीक्षा ९ मे रोजी घेण्यात येणार आहे. कृषी अभ्यासक्रमासाठी महत्त्वपूर्ण असलेली पीसीबी ग्रुपची एमएचटी सीईटी पहिली प्रवेश परीक्षा २१ एप्रिल ते २६ एप्रिल दरम्यान तर दुसरी प्रवेश परीक्षा १० मे व ११ मे रोजी घेतली जाणार आहे.

## शिक्षक भरतीची संपूर्ण जबाबदारी आता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे

### महाराष्ट्रातील शिक्षक भरती प्रक्रियेत मोठा बदल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत शालेय शिक्षण विभागाने एक अत्यंत महत्त्वाचा आणि धोरणात्मक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा आणि खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षक भरतीची संपूर्ण जबाबदारी आता महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे ▶▶ पान २ वर

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
पुणे
विद्या गुरुणां गुरुः ।

## बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे निधन

**ढाका । वृत्तसंस्था**

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान आणि बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) च्या अध्यक्षा बेगम खालिदा झिया यांचे मंगळवारी सकाळी ८० व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले.



बीएनपीने जारी केलेल्या निवेदनानुसार, खालिदा झिया यांचे ढाका येथील एव्हरकेअर रुग्णालयात सकाळी ६ वाजता निधन झाले. त्या एका महिन्याहून अधिक काळ तेथे उपचार घेत होत्या. ▶▶ पान २ वर

## गुरुजी वर चक्क भटके कुत्रे मोजण्याची वेळ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**मागील काळामध्ये शिक्षकांना शैक्षणिक व्यतीरिक्त इतर कामे देण्यात येऊ नये यासाठी राज्यातील शिक्षकाने मोठे आंदोलनही केले होते. परंतु दिल्ली उच्च न्यायालयाच्या एका निकालाने शिक्षकांना निवडणूकीसह राज्य शासनाच्या उपक्रमातील कामे करणे बंधनकारक केले असले तरी दिल्ली सरकारने दिलेला हा निर्णय अनेकांना पचणी पडलेला नाही. विशेष म्हणजे शिक्षकांना भटक्या कुत्र्यांची मोजणी करण्याचे काम दिल्ली सरकारने माथी मारले आहे.**

सरकारी आणि खासगी अशा



दोन्हीकडच्या शिक्षकांना भटक्या कुत्र्यांची मोजणी करण्याची सूचना दिल्ली शिक्षण संचालनालयाने हे आदेश दिले आहेत. तसेच हे काम जनतेच्या सुरक्षेशी संबंधित असून, सर्वोच्च न्यायालयाच्या ७ नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये करण्यात येत असल्याने ते खूप महत्त्वपूर्ण आहे, असेही शिक्षण संचालनालयाने म्हटले आहे. मुलांना सुरक्षित ठेवणे आणि वेळीच समस्येची माहिती मिळवणे हा हे पाऊल उचलण्यामागचा हेतू आहे. ज्यामुळे महानगरपालिका किंवा पशू विभाग योग्य ती कारवाई करू शकतील, असे प्रशासनाने सांगितले. मात्र अनेक शिक्षक संघटनांनी या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त केली आहे. शिक्षकांचे मुख्य काम हे भटक्या कुत्र्यांची मोजणी करणे हे नाही, तर शिक्षण देणे हे आहे, असे शिक्षक संघटनांनी सांगितले. या निर्णयाबाबत सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. तसेच काही जण मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा योग्य ▶▶ पान २ वर

## जालना नगरपालिकेसाठी मनसे, अजित पवार अन वंचित आघाडी एकत्र

**जालना । प्रतिनिधी**

जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेशी (मनसे) युती केली असून, प्रकाश आंबेडकरांची वंचित बहुजन आघाडीही (वंचित) या युतीत सामील झाली आहे. ठाकरे, पवार आणि आंबेडकर घराणे पहिल्यांदाच एकत्र निवडणूक लढवत असल्याने राज्याचे लक्ष जालना महापालिकेकडे लागले आहे

महाराष्ट्रात २९ महानगरपालिकांच्या निवडणुका होत असून, या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांनी स्थानिक पातळीवर स्वतंत्र निर्णय



घेण्याचे अधिकार दिले आहेत. यामुळे अनेक ठिकाणी अप्रत्याशित युत्या आणि आघाड्या झाल्या आहेत. पारंपरिक मित्र शत्रू बनले आहेत, तर जुन्या वैऱ्यांनी हातमिळवणी केली आहे. काही ठिकाणी वर्षानुवर्षे एकत्र न येणारे पक्ष एका व्यासपीठावर आले आहेत. जालना महानगरपालिका नव्याने अस्तित्वात आल्यानंतरची ही पहिली ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६४.५० क्विंटल | २,३०० | ३,१०० | २,५७६ |
| ज्वारी/हायब्रिड : ६१.५० क्विंटल | २,३५० | ४,५०० | ३,२५६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,५०० | ६,८५१ | ६,६०७ |
| उडीद : १२.५० क्विंटल | ६९१ | ६९१ | ६९१ |
| बाजरी: २४.०० क्विंटल | २,३९६ | ३,००० | २,७४२ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,३०१ | ६,३०१ | ६,३०१ |
| सोयाबीन: ७४.५० क्विंटल | ४,१०० | ४,७९० | ४,६०५ |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

अग्रलेख

# यू-टर्न, मास्टरस्ट्रोक की प्रॅक्टिकल पॉलिटिक्स !

बारामतीच्या एआय सेंटरच्या उद्घाटनाने महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन अध्याय सुरू झाला आहे. २८ डिसेंबर रोजी उद्योजक गौतम अदानी यांच्या हस्ते शरदचंद्र पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सचे उद्घाट झाले. मंचावर शरद पवार, सुप्रिया सुळे, अजित पवार, सुनेत्रा पवार, रोहित पवार, पवार कुटुंबातील सर्व प्रमुख चेहरे एकत्र होते! जणू २०२३ ची फूट ही फक्त एक राजकीय नाटक होती आणि आता फॅमिली रियुनियनचा हंगाम सुरू झाला आहे. शरद पवार हे प्रॅक्टिकल पॉलिटिक्सचे जिवंत शाळामास्तर आहेत ते यासाठीच. त्यांची भूमिका कधीही एकाच दिशेने राहिलेली नाही. आज इंडिया आघाडीत राहून ते राहुल गांधींसोबत मोदींवर टीका आणि अदानींना देशाचा उद्यमी म्हणतात. बारामतीत अदानींच्या २५ कोटींच्या देणगीवर एआय सेंटर उभारतात आणि त्याच अदानींच्या हस्ते उद्घाट करवतात. हा यू-टर्न नव्हे, तर मास्टरस्ट्रोक आहे !

२०२३-२४ मध्ये हिंडनबर्ग रिपोर्ट आला तेव्हा काँग्रेस आणि इंडिया आघाडी अदानींच्या विरोधात आक्रमक झाली. राहुल गांधी 'क्रोनी कॅपिटलिझम' चा नारा देत होते. पण पवारांनी नेहमीच सावध भूमिका घेतली. ते म्हणाले, संयुक्त संसदीय समिती ऐवजी सुप्रीम कोर्ट कमिटीने तपास करावा. काँग्रेसला हा धक्का होता, पण पवार प्रॅक्टिकल पॉलिटिक्स करत राहिले. २०२४ च्या निवडणुकीतही ते अदानी मुद्यावर फारसे बोलले नाहीत. उलट, त्यांच्या बर्थडे डिनरमध्ये राहुल गांधी आणि गौतम अदानी एकत्र दिसले, हात मिळवले (फोटो मात्र सुप्रिया सुळेनी रोखले) आणि आता २०२५ च्या शेवटी हे बारामतीतील दृश्य. अदानी म्हणतात, शरद पवार माझे मेंटॉर आहेत. तीन दशकांपासून त्यांच्याकडून शिकतो आहे. पवार उत्तर देतात, अदानींची जीवनयात्रा मेहनती युवकांसाठी प्रेरणा आहे. गुजरातच्या दुष्काळग्रस्त भागातून मुंबईत आलेला मुलगा आज २३ राज्यांत लाखोंना रोजगार देतोय. सुप्रिया सुळे म्हणतात, गौतमभाई माझे मोठे भाऊ आहेत. चांगली-वाईट बातमी त्यांना सांगते. हे सगळे एकाच दिवशी. धक्के सोडायचे तरी किती? पण, सवय लावून घ्या, काँग्रेस अदानींच्या विरोधात पार्लमेंट ठप्प करत असताना अदानी पवारांना मेंटॉर म्हणतात. हा यू-टर्न नाही, तर प्रॅक्टिकल पॉलिटिक्सचाच क्लास आहे. यातून शिकायचे काय? आणि विकायचे काय? हे पुढच्या पिढीला सहज समजावे असा हा धडा आहे. शरद पवार हे जाणतात की सत्ता बदलते, व्यवहार बदलत नाहीत. १९९० पासून ते अनेक सरकारांमध्ये होते काँग्रेस, भाजप, शिवसेना, अगदी महायुतीमध्येही दृश्य अदृश्य रूपाने सामील झाले आहेत. अजित पवारांनी त्यांच्या पक्षात फूट पाडली. स्वत: अजित पवार एनडीएमध्ये गेले आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री झाले. तिथे त्यांनीही या प्रॅक्टिकल पॉलिटिक्सचे अनेक धडे आपण कसे गिरवले आहेत हे दाखवून दिले. परिणामी मित्र पक्षांना निधीसाठी ठणाणा करावा लागला. पण दादांचे तत्व म्हणजे तत्व होते. इतरांना पिळून काढण्यासाठी त्यांच्याकडे नियमांचे पुस्तक होते. पूर्वीच्या सरकारचा निधी आणि विकासकामे रोखली असा आरोप होतो. पण नंतर त्यांनी तोच निधी आपल्या आवडत्या आणि नावडत्यांमध्ये बरोबर वाटून दाखवला हे सुद्धा प्रॅक्टिकल पॉलिटिक्सच. त्यावेळी अनेक ठिकाणी पवारांचे समर्थक अजित पवारांना वाकुल्या दाखवत होते. आता हे चित्र बघून ते निष्ठावान समर्थक मातीत मान घालायचे तेवढे राहिले आहेत. आपण कशासाठी आणि कोणासाठी भांडलो? असा त्यांना पडलेला प्रश्नच मिथ्या आहे. हे जग धावते आहे आणि त्याच्या बदलानुसार बदलले पाहिजे. लोक काय विसरून जातील, ते विसरण्यासाठीच जन्माला आले आहेत हे प्रॅक्टिकली कायमचे मान्य केले पाहिजे. कारण, महाराष्ट्रात उभी फूट पडून लोक एकमेकांच्या विरोधात उभे राहिले. घसा कोरडा पडेपर्यंत ओरडत राहिले आणि कोसळत्या पावसातही ऐकत राहिले. त्यांनी आपली फसवणूक झाली असे समजू नये तर त्यांना एक नवा धडा शिकायला मिळाला म्हणून थोर गुरुचे पाद्यपूजन करत राहिले पाहिजे.

शरद पवारांची भूमिका बदलणे ही स्ट्रॅटेजी आहे. इतरांनी बदलली की ती गद्दारी असते त्यामुळेच पवार एकाच वेळी विरोधक आणि मित्र दोघांनाही हाताळतात. आज इंडियामध्ये, उद्या एनडीएच्या जवळ, परवा अदानींच्या मंचावर असतात. विशेष म्हणजे या सगळ्या ठिकाणच्या तत्वनिष्ठ नेत्यांना सुद्धा ते हवे असतात. त्यांचे सुद्धा ते प्रॅक्टिकल पॉलिटिक्सचे एखादे मॉडेलच असावे, असे प्रयोग करत राहून या देशाचा विकास होतो आणि राजकारणातील एक्सलन्स साधता येतो. अर्थात त्यामध्ये काहींचा ॲक्सीडेंट होतो. पण तेवढी किंमत तर चुकवावी लागणारच. शेवटी प्रॅक्टिकल विचार महत्त्वाचा. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पवारांनी अदानी मुद्दा टाळला, २०२५ मध्ये मात्र अदानींना युवकांची प्रेरणा म्हणून सादर केले. हा बदल व्यवहारसाठी, बारामतीच्या विकासासाठी, आणि पवार कुटुंबाच्या एकजुटीसाठी. तरुण राजकारण्यांनो, शरद पवारांकडून शिका. टीका करा, पण दरवाजा बंद करू नका. फूट पाडा, पण रियुनियनची तयारी ठेवा. मेंटॉर बना किंवा बनवा, ज्यांच्याकडून फंडिंग आणि मेंटॉरशिप दोन्ही मिळेल असे शोधा. आणि सर्वांत महत्त्वाचे भूमिका बदलणे ही कमजोरी नाही, तर ताकद आहे हे बाळकडू पचवायची तयारी ठेवा. बारामतीतल्या या एआय सेंटरने एक गोष्ट सिद्ध केली शरद पवार अजूनही गेम चेंजर आहेत. ते राजकारण खेळतात, पण व्यवहार जिंकतात. म्हणूनच प्रॅक्टिकल पॉलिटिक्सची शरद पवारांसारखी सवय ठेवा. कारण महाराष्ट्रात अजूनही पवार हेच राजा आहेत आणि प्रजा ही राजा सारखीच असली पाहिजे.


## संत चारधाम या संतचरित्र ग्रंथाचे डॉ.नामदेव शास्त्रींच्या हस्ते प्रकाशन होणार

अहिल्यानगर । प्रतिनिधी

श्री संत भगवान बाबा, श्री संत वामनभाऊ महाराज, श्री संत नारायण महाराज आणि श्री संत खंडोजीबाबा या संतांचे चरित्र असलेला संत चारधाम या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा श्री संत भगवान बाबांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने दि.४ जानेवारी २०२६ रोजी श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ.नामदेव शास्त्री यांच्या शुभहस्ते श्री क्षेत्र भगवान गडावर होणार असल्याची माहिती चरित्र ग्रंथांचे लेखक ह.भ.प.प्रोफेसर डॉ.सुभाष शेकडे यांनी दिली. महाराष्ट्राच्या आध्यात्मिक व वारकरी परंपरेमध्ये पाथर्डी तालुक्यातील व बीड जिल्ह्यातील श्री संत भगवान बाबा वामनभाऊ महाराज, नारायण महाराज व खंडोजी बाबा यांचे मोठे योगदान आहे..या चारही संतांचे स्वतंत्र चरित्र ग्रंथ अनेक लेखकांनी लिहिलेले आहेत. मात्र हा चार संतांचा एकत्रित ग्रंथ मात्र पहिल्यांदाच संत चारधाम म्हणून डॉक्टर सुभाष शेकडे यांनी संपादित केलेला आहे. या ग्रंथात सर्व संताचे विचार व माहिती, त्यांचे जीवन चरित्र ग्रंथामध्ये नमूद केलेले आहे. डॉ.सुभाष शेकडे यांची आतापर्यंत अनेक संदर्भ ग्रंथ व पुस्तके आणि साहित्य प्रकाशित झालेले आहेत. डॉ.शेकडे यांची कौटुंबिक पार्श्वभूमी अत्यंत सर्वसाधारण व शेतकरी कुटुंबातील असताना देखील त्यांचे साहित्य क्षेत्रातील व शिक्षण क्षेत्रातील योगदान मोठे आहे. त्यामुळे संत चारधाम या संतांच्या चरित्र ग्रंथांचा मोठा वाचक वर्ग असणार आहे. श्रीक्षेत्र भगवानगडावर होणाऱ्या या प्रकाशन सोहळ्यामध्ये राज्यभरातून आलेले या चारही संतांचे भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या सर्वांच्या उपस्थितीमध्ये व गडाचे महंत डॉ.नामदेव शास्त्री यांच्या शुभहस्ते होणाऱ्या या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन चरित्र ग्रंथ प्रकाशन समितीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# बीडमध्ये पहिल्यांदाच २ दिवसांच्या, १.५ किलो वजनाच्या बाळावर यशस्वी शस्त्रक्रिया

## श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नवजात व बाल शस्त्रक्रिया विभाग सुरू


तलवाडा प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरणाऱ्या एका ऐतिहासिक वैद्यकीय यशामध्ये, फक्त २ दिवसांचे, १.५ किलो वजनाचे. सय्यद सैफ अली यांच्या बाळाची अकाली (प्रीटर्म) बाळ यांच्यावर ॲनोरेक्टल मालफॉर्मेशन (गुदद्वार न उघडणे) या गंभीर जन्मजात आजारावर बीडमध्ये प्रथमच यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली.**

ही ऐतिहासिक शस्त्रक्रिया बीड शहरातील श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, शासकीय विश्राम गृह शेजारी, नगर रोड बीड येथे पार पडली. या रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉ. एकनाथ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही अतिशय गुंतागुंतीची व नाजूक बालशस्त्रक्रिया प्रसिद्ध बालशल्यचिकित्सक एमसीएच सर्जन डॉ. नागेश उंदरे यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. शस्त्रक्रियेदरम्यान सुरक्षित व दक्ष भूल व्यवस्थापन भूलतज्ज्ञ डॉ. तुकाराम बडे यांनी केले. यावेळी या रुग्णालयातील आरएमओ डॉ. झिशान मोमीन, ओटी तंत्रज्ञ दयानंद राठोड, शिवाजी वांडरे, राम मंदे यांनी महत्वाची भूमिका बजावली. बाळाची शस्त्रक्रियेनंतर प्रकृती स्थिर असून समाधानकारक सुधारणा होत आहे. अधिक उपचारांसाठी बाळाला याच रुग्णालयाच्या मध्ये भरती केले आहे. ही कामगिरी वैद्यकीय क्षेत्रात सर्वत्र कौतुकास्पद ठरत असून, बीडच्या आरोग्यसेवेसाठी हा एक अभिमानाचा व ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. बीड जिल्ह्यात अद्ययावत व प्रगत अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालिटी हॉस्पिटल ओळखले जाते. या रुग्णालयात कर्करोग , किडनी, हृदयरोग व कॅथलॅब, नेत्ररोग, कान नाक घसा, जॉइंट रिप्लेसमेंट, मणक्यांचे आजार, छातीरोग, अशा विविध एक ना अनेक आजारावर उपचार व शस्त्रक्रिया आधीपासूनच विविध शासकीय योजनेतून मोफत करण्यात येत आहेत. आता नवजात व बाळांसाठी शस्त्रक्रिया विभाग सुरू करून त्यासाठी आवश्यक सर्व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आता बाल शक्यचिकित्सक व त्या साठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध झाल्यामुळे, बीड व आजूबाजूच्या जिल्ह्यातील रुग्णांना छ. संभाजीनगर, पुणे, मुंबई सारख्या मोठ्या शहरांकडे जाण्याची आवश्यकता राहिलेली नाही. विशेष म्हणजे, ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना () अंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आली, ह्यासाठी खाजगी रुग्णालयात यासाठी ३ ते ४ लाख रुपयाचा खर्च लागतो. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही उच्च दर्जाच्या उपचारांचा लाभ श्री सिद्धिविनायक सुपरस्पेशियालीटी हॉस्पिटल च्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील रुग्णांना मोफत मिळणार आहे.

# होळच्या कोलंबस स्वस्त धान्य दुकानाची १०० टक्के अनामत जप्त, ५ हजार दंड

केज । प्रतिनिधी

**तालुक्यातील होळ येथील कोलंबस मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या स्वस्त धान्य दुकानाच्या धान्याचा काळाबाजार उघडकीस आला होता. या दुकानाचे धान्य धारूरमध्ये पोलिसांनी दि.१४ जुलै रोजी पकडले होते. त्यानंतर केज तहसीलच्या पुरवठा विभागाने तपासणी केली असता धान्याची तफावत आढळून आली होती. या अहवालावरून जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी स्वस्त धान्य दुकानाची १०० टक्के अनामत जप्त, ५ हजार रुपये दंड आणि ५०० रुपयांच्या बाँडवर बंधपत्र घेण्याचे आदेश सोमवारी (दि.२९) दिले आहेत.**

होळ येथील कोलंबस मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या रास्त भाव दुकानाचे प्राधिकारपत्र चेअरमन रामचरण उर्फ बंडू घुगे यांच्या नावावर आहे. या दुकानासंदर्भात जिल्हा पुरवठा अधिकारी शिवकुमार स्वामी यांनी शासन निर्णय दि.७ जून २०२१ नुसार कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार संबंधित दुकानदाराकडून नव्याने १०० टक्के अनामत रक्कम शासनखाती जमा करून घेण्यासह अन्य दंड म्हणून ५ हजार रुपये वसूल करून शासन खात्यात जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यापुढे अशा स्वरूपाच्या तक्रारी उद्भवू नयेत आणि प्राधिकारपत्रातील अटी व शर्तींचा भंग होणार नाही, यासाठी तहसीलदारांनी संबंधित रास्त भाव दुकानदाराला सक्त ताकीद देऊन ५०० रुपयांच्या बाँडवर लेखी बंधपत्र घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु, धान्य जप्त केलेले धारूर पोलिस गुन्हा कधी नोंद करणार? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. दि.१४ जुलै २०२५ रोजी दुपारी ४.३० वाजता होळचे उपसरपंच बाळासाहेब तुकाराम घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्था अंतर्गत असलेल्या राशन दुकानातून ४४ क्विंटल स्वस्त धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना धारूर पोलिसांनी टेम्पो क्रमांक एम.एच. ४४ यू २२५७ सह धान्य जप्त केले. हे धान्य अशोक तुकाराम घुगे यांच्यामार्फत विक्रीसाठी नेले जात असल्याची कबुली वाहन चालक इब्राहिम शेख याने पोलिस पंचनाम्यात दिली होती. तरीही गुन्हा दाखल करण्याकडे पुरवठा विभागासह पोलिसांनी 'अर्थ'पूर्ण दुर्लक्ष केले आहे. फौजदारी कारवाईसाठी धारूरचे सहायक पोलिस निरीक्षक देविदास वाघमोडे आणि तहसीलदार श्रीकांत निळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी नारायण काकडे यांनी एकमेकांकडे बोट दाखवल्याने गुन्हा दाखल होऊ शकलेला नाही. याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन छेडण्याचा इशारा तक्रारदार विजय केंद्रे, धनराज लाटे यांच्यासह ग्रामस्थांनी दिला आहे.

# निसर्गाच्या सानिध्यात विद्यार्थ्यांचा आनंददायी दिवस

## प्रा.शा.तळवट बोरगावच्या विद्यार्थ्यांची निसर्गसहल



तळवट बोरगाव । प्रतिनिधी

सहल! आणि तीही निसर्गसहल! लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आनंद देणारा हा शब्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगावच्या विद्यार्थ्यांसाठी अनुभवात उतरला. वर्ग पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निसर्गसहलीने एक दिवस दप्तरमुक्त, कृतीयुक्त व आनंददायी शिक्षणाचा ठरला.

सहलीच्या आदल्या दिवसापासूनच विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत होता. सहलीच्या दिवशी सकाळीच सर्व विद्यार्थी शाळेत जमा झाले होते. छोटे बालचमू डबा व पाण्याची बाटली घेऊन, शाळेच्या गणवेशात सहलीसाठी सज्ज झाले होते. शिक्षकांनी आवश्यक सूचना दिल्यानंतर सर्व विद्यार्थी शिक्षकांसह गावाजवळील गणपती मंदिराकडे पायी निघाले. सकाळची आल्हाददायक थंडी, कोवळी उन्हाची किरणे, शेतातून जाणारी पायवाट, हिरवीगार पिके, शेतकरी, विहिरीतील पाणी आणि रानमेव्यांचा अनुभव घेत विद्यार्थ्यांनी निसर्गाचा मनमुराद आनंद लुटला. या सहलीतून विद्यार्थ्यांना निसर्गातील विविध घटकांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. गणपती मंदिरात पोहोचल्यानंतर सहलीची सुरुवात गणेश पूजनाने झाली. सभामंडपात विद्यार्थ्यांनी विविध कला सादर केल्या. प्राणीपक्ष्यांचे आवाज, शिवाजी महाराजअफजलखान भेट प्रसंगाचे नाट्य सादरीकरण, गाणी, कथा, नक्कल, नाट्यछटा, सामूहिक नृत्य अशा विविध उपक्रमांनी वातावरण रंगून गेले. श्रीमती अंबिलवादे मॅडम यांनी शब्दसंपत्ती वाढीसाठी शाब्दिक खेळ घेतले, तर मुख्याध्यापक शशिकांत कुलथे यांनी इंग्रजी शब्दार्थ वाचन व स्मरणाचा खेळ घेतला. दुपारी सहभोजनाचा आनंद घेताना शालेय पोषण आहाराच्या घोलपताई यांनी विद्यार्थ्यांसोबत भेळ तयार केली. ''कृतीतून शिक्षण'' हा अनुभव विद्यार्थ्यांसाठी विशेष ठरला. भोजनानंतर हिरवळीवर खेळ, झोपाळ्यांचा आनंद आणि सामूहिक छायाचित्रण झाले. संध्याकाळी परतीच्या प्रवासातही विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व उत्साह दिसून येत होता. ही निसर्गसहल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरली. सहल यशस्वी करण्यासाठी शिक्षक गोरे सर, अंबिलवादे मॅडम तसेच मुख्याध्यापक कुलथे सर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पान १ वरून...

### शासनाकडून कर्जमाफीची

माहिती संकलनाची प्रक्रिया व्यापक बनली आहे. नियमित कर्जदारांना प्रोत्साहन अनुदान शक्य पाच वर्षे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची स्वतंत्र माहिती मागवण्यात आल्याने, थकबाकीदारांना कर्जमाफी मिळाली तरी नियमित कर्जदारांनाही प्रोत्साहन अनुदान किंवा सवलतीची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती ८४ कॉलममध्ये, तर नियमित कर्जदारांची माहिती ३२ कॉलममध्ये भरण्याचे निर्देश आहेत. यात वैयक्तिक तपशील, कर्जाचा प्रकार, थकित तारीख, आधार व पॅन क्रमांक, बँक तपशील आदींचा समावेश असल्याने माहिती संकलनास विलंब होत असल्याचे संस्थांकडून सांगण्यात येत आहे

------------

### नववर्षात ८ वा

वेतन आयोगाच्या शिफारसी साधारणपणे दर दहा वर्षांनी लागू केल्या जातात. सरकारच्या अधिसूचनेनुसार, ८ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी १ जानेवारी २०२६ पासून लागू होण्याची अपेक्षा आहे. मात्र, आयोगाला आपला अहवाल सादर करण्यासाठी सुमारे १८ महिने दिले गेले आहेत. याचा अर्थ असा की १ जानेवारी २०२६ पासून लगेच पगार वाढणार नाही. तोपर्यंत ७ व्या वेतन आयोगाचीच व्यवस्था लागू राहील. कर्मचारी आणि पेन्शनर्सना सध्याचा महागाई भत्ता आणि इतर भत्तेच मिळत राहतील. कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक बाब म्हणजे, वेतन आयोग लागू होण्याची प्रभावी तारीख १ जानेवारी २०२६ हीच मानली जाणार आहे. याचा अर्थ, शिफारसी स्वीकारल्यानंतर ज्या तारखेपासून नवीन पगार लागू होईल, त्या तारखेपासून मागे जाऊन १ जानेवारी २०२६ पासूनचे संपूर्ण एरियर कर्मचाऱ्यांना आणि पेन्शनर्सना मिळेल. मागील वेतन आयोगांमध्येही अशीच पद्धत अवलंबण्यात आली होती, त्यामुळे एकरकमी मोठी रक्कम मिळण्याची शक्यता आहे.

-------------

### राज्यात १४ ठिकाणी भाजप

आनंदाचे वातावरण होते, तर अनेक पदाधिकाऱ्यांना ऐनवेळी तिकीट नाकारण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी पक्षाशी दीर्घकाळ निष्ठा राखणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलण्यात आल्याचा आरोप होत असून काही ठिकाणी पक्षांतर करणाऱ्या 'आयाराम' नेत्यांना तिकीट देण्यात आल्याने अंतर्गत असंतोष उफाळून आला आहे. भाजपा आणि शिंदे शिवसेना यांच्यात जरी १४ ठिकाणी महायुती तुटली असली, तरी मुंबई आणि ठाण्यासारख्या राज्यातील अत्यंत महत्त्वाच्या महानगरपालिकांमध्ये भाजप आणि शिंदे गटामध्ये युती कायम ठेवण्यात आली आहे. मात्र या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना युतीपासून दूर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे मुंबई आणि ठाण्यातील राजकीय समीकरणे वेगळी असणार आहेत. दरम्यान, राज्यातील सर्व महानगरपालिका निवडणुकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे. मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर या महापालिका भाजप, शिंदे गट आणि ठाकरे गटासाठी प्रतिष्ठेच्या मानल्या जात आहेत. त्यामुळे जिथे युती कायम आहे आणि जिथे युती तुटली आहे, त्या दोन्ही ठिकाणी मतदारांचा कौल नेमका कुणाच्या बाजूने जाणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

------------

### सीईटीच्या नोंदणीला १

पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन सामाईक प्रवेश परीक्षा व ७३ अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येतात. व हे प्रवेश ५७०० पेक्षा जास्त शैक्षणिक संस्थामधून दिले जातात. प्रवेश देण्यासाठी प्रवेशपूर्व परीक्षा घेण्यात येते. आगामी शैक्षणिक वर्षात बहुतांश व्यावसायिक अभ्यासक्रमांची सीईटी परीक्षा मार्च, एप्रिल आणि मे महिन्यात घेण्याचे प्रस्तावित केले आहे. त्यामध्ये यंदापासून इंजिनिअरिंग, फार्मसी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणारी पीसीएम ग्रुपची एमएचटी सीईटी आणि कृषी अभ्यासक्रमासाठी महत्त्वपूर्ण असलेली पीसीबी ग्रुपची एमएचटी सीईटी, तसेच एमबीए / एमएमएस अभ्यासक्रमांची सीईटी परीक्षा दोनदा घेतली जाणार आहे. त्यांचे नियोजन सीईटी सेलने सुरू केले असून, त्याचे संभावित वेळापत्रक जाहीर केले आहे. याबरोबरच सीईटी परीक्षेसाठी नोंदणी करताना उमेदवारांना आधार प्रमाणीकरण आणि अपार आयडी सक्तीचा करण्यात आल्याची माहिती राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने दिली आहे. सीईटी परीक्षा वेळेत होऊन प्रवेश प्रक्रियाही वेळेवर पार पाडण्याचा सीईटी सेलचा प्रयत्न आहे. त्यानुसार आता १ जानेवारी पासून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक सीईटी परीक्षांची नोंदणी सुरू केली जाणार आहे. त्यादृष्टीने सीईटी सेलचे प्रयत्न सुरू आहेत.

------------

### एलपीजी सबसिडी

अधिकाऱ्यांना या सूत्रात अमेरिकन बेंचमार्क किंमत आणि ट्रान्सअटलांटिक शिपमेंटच्या उच्च मालवाहतुकीचा खर्च समाविष्ट करायचा आहे. अहवालानुसार, सौदी च्या तुलनेत किंमत सवलत शिपिंग खर्च भागवण्यासाठी पुरेशी असेल तरच अमेरिकेतील एलपीजी भारतासाठी परवडेल. अमेरिकेतील शिपिंग खर्च सौदी अरेबियापेक्षा अंदाजे चार पट जास्त आहे. गेल्या महिन्यात, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी अमेरिकेतून दरवर्षी २.२ दशलक्ष मेट्रिक टन एलपीजी आयात करण्यासाठी एक वर्षाचा करार केला, हा करार २०२६ साठी आहे.

--------------

### बांगलादेशच्या माजी पंतप्रधान

निवेदनात म्हटले आहे की, बीएनपीच्या अध्यक्षा आणि माजी पंतप्रधान, राष्ट्रीय नेत्या बेगम खालिदा झिया यांचे आज सकाळी ६ वाजताच्या प्रार्थनेनंतर निधन झाले. पक्षाचे नेते आणि समर्थकांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आणि बांगलादेशच्या आधुनिक राजकीय इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या एका उत्तुंग राजकीय व्यक्ती म्हणून त्यांचे स्मरण केले. पक्षाने म्हटले आहे की, आम्ही त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना करतो आणि सर्वांना विनंती करतो की त्यांच्या आत्म्याला शांती मिळावी. हृदय आणि फुफ्फुसाच्या गंभीर आजारामुळे खालिदा झिया यांना २३ नोव्हेंबर रोजी एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. बांगलादेशी माध्यमांच्या वृत्तानुसार, शेवटच्या आठवड्यात त्यांना न्यूमोनियाचा त्रास झाला. त्या ३६ दिवस वैद्यकीय निरीक्षणाखाली होत्या आणि त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले. गेल्या काही वर्षांपासून, माजी पंतप्रधान यकृत सिरोसिस, मधुमेह, संधिवात आणि मूत्रपिंड, फुफ्फुस, हृदय आणि डोळ्यांच्या समस्यांसह अनेक जुनाट आजारांशी झुंजत होत्या. त्यांच्या उपचारांवर बहुआयामी वैद्यकीय पथकाचे पर्यवेक्षण करण्यात आले, ज्यामध्ये बांगलादेशी तज्ञ तसेच युनायटेड किंगडम, अमेरिका, चीन आणि ऑस्ट्रेलियातील डॉक्टरांचा समावेश होता. या महिन्यात, त्यांना चांगल्या वैद्यकीय सेवेसाठी परदेशात पाठवण्याबाबत चर्चा झाली. तथापि, डॉक्टरांनी त्यांची शारीरिक स्थिती आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी खूपच कमकुवत असल्याचा सल्ला दिल्यानंतर त्या योजना अखेर रद्द करण्यात आल्या.

------------

### शिक्षक भरतीची संपूर्ण जबाबदारी

सोपवण्यात आली आहे. शिक्षक भरतीसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांचे आयोजन आणि त्यानंतरची निवड प्रक्रिया या दोन्ही गोष्टी एकाच संस्थेच्या नियंत्रणाखाली राहाव्यात, या मुख्य उद्देशाने शासनाने हा मोठा निर्णय घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णयही प्रसिद्ध करण्यात आला आहे. राज्यात २०१७ पासून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरतीची प्रक्रिया शिक्षण आयुक्तालयामार्फत राबवली जात होती. मात्र, शिक्षण आयुक्त कार्यालय हे शालेय शिक्षण विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावरील प्रमुख प्रशासकीय कार्यालय आहे. शासनाच्या विविध शैक्षणिक धोरणांची आणि निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करणे, त्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे ही या कार्यालयाची मूळ जबाबदारी आहे. शिक्षक पदभरती ही एक निरंतर चालणारी आणि अत्यंत वेळखाऊ प्रक्रिया आहे. यामध्ये उमेदवारांच्या अभियोग्यता चाचणीनंतर त्यांचे स्व-प्रमाणीकरण करणे, विविध शाळांच्या जाहिराती स्वीकारणे, विषयानुसार आणि प्रवर्गानुसार समांतर आरक्षणाची पडताळणी करणे, पात्रता गुण (कटऑफ) निश्चित करणे आणि उमेदवारांची शिफारस करणे अशी गुंतागुंतीची कामे करावी लागतात. या तांत्रिक कामांमुळे शिक्षण आयुक्त कार्यालयाचा बराचसा वेळ खर्ची पडत होता, ज्याचा विपरीत परिणाम इतर महत्त्वाच्या शैक्षणिक निर्णयांच्या अंमलबजावणीवर होत असल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही एक स्वायत्त संस्था असल्याने आणि त्यांच्यामार्फत आधीच शिक्षक पात्रता परीक्षा व शिक्षक अभियोग्यता चाचणी घेतल्या जात असल्याने, भरतीचे कामकाज त्यांच्याकडे सोपवणे अधिक सोयीचे ठरणार आहे.

**'सुकाणू समिती'ची स्थापना**

परीक्षा परिषदेला यापूर्वीही अशा भरती प्रक्रियेचा अनुभव असल्याने परीक्षा आयोजन आणि निवड प्रक्रिया एकाच छताखाली येणे शक्य होणार आहे. या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एका 'सुकाणू समिती'ची स्थापना करण्यात आली असून, यामध्ये विविध विभागांच्या संचालकांचा समावेश असेल. आगामी शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी २०२५ पासून शिक्षक भरतीचे सर्व कामकाज परीक्षा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

-------------

### जालना नगरपालिकेसाठी मनसे, अजित

निवडणूक आहे. त्यामुळे शहराचा पहिला महापौर कोणाचा होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर सर्व राजकीय पक्षांनी आपापले गणित जुळवण्यास सुरुवात केली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने महायुतीतून बाहेर पडल्यानंतर मनसेशी चर्चा केली आणि युती निश्चित झाली. या युतीची घोषणा अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष आणि मनसेच्या जिल्हाध्यक्षांनी केली. जालना महापालिकेच्या ६५ जागांसाठी राष्ट्रवादीचे ५० उमेदवार आणि मनसेचे ६ उमेदवार रिंगणात उतरणार आहेत. महायुतीतील भाजप आणि एकनाथ शिंदे गटाची शिवसेना स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. भाजप ६५ पैकी ६४ जागांवर लढत असून, आरपीआय (आठवले) एक जागा लढवणार आहे. शिंदे गट सर्व ६५ जागांवर उमेदवार उभे करणार आहे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण म्हणाले, महायुतीतील पक्ष आम्हाला नगण्य समजत होते आणि सोबत घेण्यास तयार नव्हते. आता जालना महापालिकेचा पहिला महापौर राष्ट्रवादीचाच होईल. या युतीमुळे निवडणुकीचे चित्र पूर्णपणे बदलले आहे. महाविकास आघाडीत (एमव्हीए) काँग्रेस वरचढ ठरली आहे. काँग्रेस ४० जागा लढवणार असून, शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी १३ जागा आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या १२ जागा लढवणार आहेत. एमव्हीए एकत्र निवडणूक लढवत असल्याने त्यांचा दावा मजबूत मानला जात आहे. मात्र, निवडणुकीच्या निकालातच महापालिकेचे अंतिम चित्र स्पष्ट होईल. या निवडणुकीतून राज्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. जालना शहराच्या विकासासाठी ही निवडणूक महत्त्वाची ठरणार असून, मतदार कोणत्या युतीला पसंती देतात, हे निकालावरून स्पष्ट होईल.

---------

### गुरुजी वर चक्क भटके कुत्रे

निर्णय असल्याचे सांगत आहेत. तर काही जण सरकारने यासाठी वेगळा स्टाफ किंवा एजन्सी नियुक्त केली पाहिजे असे सांगत आहेत. ही पद्धत दिल्ली सरकारने सुरू केली असली तरी त्याचे पडसाद मात्र राज्यभर उमटत आहेत. दिल्ली सरकारने घेतलेला निर्णय तेथील शिक्षकांनी अमलात आणला आणि यशस्वी झाला तर त्या पद्धतीनेच देशातील सर्व राज्यांमध्ये हा उपक्रम राबवला जाऊ शकतो. त्यामुळे शिक्षक संघटनांनी या निर्णयाला विरोध केला आहे. याचे लोन अद्याप महाराष्ट्रात पसरले नसले तरी याची भीती मात्र सर्वच शिक्षकांच्या मनात आहे.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५



## थोडक्यात



### गुरुग्लोबल प्री स्कूलची सहल उत्साहात संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी


गुरू ग्लोबल प्री स्कूल, माजलगाव संचालिका अरुणा राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २५डिसेंबर रोजी शैक्षणिक सहल श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे करण्यात आले. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी देवदर्शन, विविध खेळ, डोंगर, झाडी निसर्गात अत्यंत उत्साही व आनंदी वातावरणात पार पडली.

सहलीदरम्यान चिमुकल्या विद्यार्थ्यांनी निसर्गाच्या सान्निध्यात विविध अनुभव घेतले. खेळणी, बागेतील फेरफटका तसेच विविध मनोरंजनात्मक खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या सहलीसाठी शाळेतील शिक्षकवृंद अश्विनी एखंडे, सुप्रिया खेत्री, रेखा खळगे व ज्ञानेश्वरी चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांची सुरक्षितता, काळजी व मार्गदर्शन शिक्षकांनी उत्तम प्रकारे केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद व उत्साह या सहलीचे यश स्पष्टपणे दर्शवत होता. या उपक्रमाबद्दल पालकांनी शाळेच्या व्यवस्थापनाचे, संचालिका व शिक्षकांचे कौतुक केले. अशा शैक्षणिक सहलींमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मत यावेळी पालकांनी व्यक्त केले .

### थर्टी फर्स्टऐवजी रंगणार भक्तीचा सत्संग; आर्ट ऑफ लिव्हिंगची जय्यत तयारी

माजलगाव । प्रतिनिधी

आजचा समाज रात्रभर एन्जॉय करण्यापेक्षा सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत पाश्चात्य संस्कृतीनुसार पार्ट्यां न करता, भक्तिमार्गाने गान ध्यान आणि ज्ञान हे सत्संगाचा मुख्य उद्देश आहे. अध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकरजी आर्ट ऑफ लिविंग माजलगाव परिवाराने केला आहे.



सदरील कार्यक्रम दि.३१ डिसेंबर २०२५, बुधवार वैष्णवी मंगल कार्यालय, माजलगाव येथे सायं.६ ते रात्री १२ या वेळेत होईल. त्यादिवशी पुत्रदा एकादशी आहे. या भव्य सत्संगासाठी मुख्य मार्गदर्शक स्वामी प्रणवानंदजी, प्रमुख उपस्थिती भास्करभाऊ मगर युवकांना योग्य दिशा मार्गदर्शन करतील, कार्यक्रमासाठी मुख्य गायक प्रज्ञेश भैय्या व रागेश्री जोशी आहेत. गान, ध्यान आणि ज्ञान हे कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण आहे. सर्व समाजात आनंद, प्रेम, सुख, शांती लाभावी व मनात सकारात्मक विचारांची वाढ व्हावी हा उद्देश आहे. या सोहळ्यात नामांकित कीर्तनकार आणि प्रवचनकारांचे मार्गदर्शन लाभणार आहे. भक्ती संगीत, सामूहिक नामस्मरण आणि सरत्या वर्षाला कृतज्ञतेने निरोप देणारे कार्यक्रम यात समाविष्ट आहेत तसेच नंतर महाप्रसाद होईल. भाविकांसाठी आवश्यक सोयीसुविधा, वाहनतळ आणि बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.

भाविकांना आवाहन:

''थर्टी फर्स्ट'' च्या नावाखाली होणारे गैरप्रकार टाळून तरुण पिढीने आणि नागरिकांनी आपल्या समृद्ध संस्कृतीशी जोडले जावे, यासाठी या सत्संगाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आर्ट ऑफ लिविंग परिवार माजलगाव च्या वतीने करण्यात येत आहे.

# माजलगाव तहसीलदारांचा अजब कारभार : चक्क वारोळा सज्जावरील कोतवालास घेतले वाहन चालक पदावर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तहसीलदार यांच्या अनेक चर्चा माजलगाव वाशीयांना पहावयास आणि ऐकवयास मिळत आहेत. माजलगाव तहसीलदारांचे तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यावर कसल्याच प्रकारचे नियंत्रण नसून आओ जाओ घर तुम्हारा है, या म्हणीप्रमाणे कर्मचारी स्वतःच्या मर्जीनुसार कार्यालयात येतात आणि जातात. कार्यालयीन वेळेत कधीच तहसीलदार व कर्मचारी हजर नसतात कारण तहसीलदारांना वेळेचे भान नसेल तर कर्मचारी काय भान राखणार हा प्रश्न अनुत्तरीतच आहे.

माजलगावच्या तहसीलदारांची ओळख ही कामे कमी आणि मनमानी करणारा अधिकारी म्हणूनच जास्त आहे. अशातच तहसीलदार साहेबांनी वारोळा येथील सज्जाचे कोतवाल यांना आपल्या सोयीनुसार मनमानी कारभार करत वाहन चालक या पदावर घेतले असून वारोळा येथील ग्रामस्थांची गैरसोय ते करत आहेत.

माजलगाव तहसीलदार यांचा मनमानी कारभार वारोळा सध्याच्या कोतवालास वाहन चालक म्हणून घेतले पदावर

कोतवाल सेवा वरिष्ठ कार्यालयास संलग्नित न करता सज्जा कार्यालयास त्वरित वर्ग करण्याबाबत अहवाल असताना देखील माजलगाव तहसीलदारांचा मनमानी कारभार पहावयास मिळत आहे. माजलगाव तहसीलदारांनी स्वतःच्या सोयीनुसार व स्वतःच्या फायद्यासाठी वारोळा सज्जाचे कोतवाल यांना वाहन चालक म्हणून घेतले असून वारोळा ग्रामस्थांची गैरसोय करणे योग्य आहे का! जर तहसीलदारांना वाहनचालकाची एवढीच गरज असेल तर त्यांनी वारोळा वासियांना



नवीन गावातीलच कोतवालाची भरती करावी असे समस्त वारोळा वाशियातून बोलले जात असून.

दि. १८ जानेवारी २०१९ रोजी चा अहवाल माजलगाव तहसीलदार हे विसरले आहेत की काय? कोतवालांच्या सेवा वरिष्ठ कार्यालयास संलग्नित न करता संबंधित या त्या सज्जा कार्यालयास त्वरित वर्ग करण्याबाबत मनु कुमार श्रीवास्तव यांच्या सही निशी आहे. परंतु माजलगाव चे तहसीलदार या अहवालाची पायमल्ली करत असून या अहवालाला केराची टोपली दाखवत आहेत.याबाबतीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी माजलगाव तहसीलदारांची चौकशी करतील का? व योग्य ती कार्यवाही करतील का असा सवाल तालुक्यातील जनतेतून चर्चिला जात आहे.तसेच तलाठी मंडळ अधिकारी यांना दिलेल्या सज्जावर उपस्थित राहणे बंधन कारक असताना तालुक्याच्या ठिकाणी कार्यालय थाटून बसण्यास माजलगाव तहसीलदारांचे पुरेपूर अभय असून ही कायद्याची पायमल्ली आहे. यामुळे तलाठी मंडळ अधिकारी मस्तावले असून तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, माळेवाडी, गोविंदपूर, मोगरा, डिग्रस अशा अनेक वाळूच्या ठिकाणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत वाळू माफियांना अभय देत कारवाई करण्यास टाळाटाळ करणे या सर्व बाबी ची सखोल चौकशी, व उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी यांचे चालू वेतन बंद करून त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करावे व त्यांच्यावर गुन्हे दाखल करावे अन्यथा येत्या दहा दिवसात लोकशाही मार्गाने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) च्या वतीने असणाऱ्या कार्यकर्त्यांच्या सह्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने तिरडी आंदोलन करणार असल्याचे निवेदन बीड जिल्हा सरचिटणीस नईम करीम आतार यांनी दिले असून यात काही अनुचित प्रकार घडल्यास किंवा तिरडी आंदोलनास किंवा माझ्या जीवित धोका निर्माण झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असे निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

## शेतीनिष्ठ शेतकरी म्हणून यंदाचा गंगाई बाबाजी पुरस्कार इंजिनिअर शहाजीराव भोसले यांना जाहीर

आष्टी । प्रतिनिधी

माजी आमदार शिक्षण महर्षी भिमरावजी धोंडे साहेब हे गेल्या अनेक वर्षापासून आपल्या आई-वडिलांच्या पित्यार्थ गंगाई बाबाजी महोत्सवाचे आयोजन करतात यामध्ये काही निवडक व्यक्तींना विविध क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना गंगाई बाबाजी पुरस्काराने ते सन्मानित करतात यामध्येच आष्टी शहरातील मूळचे सांगवी पाटण येथील सेवानिवृत्त इंजिनियर शहाजीराव भोसले यांना यंदाचा शेतीनिष्ठ गंगाई बाबाजी पुरस्कार जाहीर झाला आहे.



ग्रामीण भागातील शेतीला आधुनिकतेची जोड देत शाश्वत शेतीचा आदर्श निर्माण करणारे, प्रयोगशील व कष्टाळू शेतकरी इंजिनिअर शहाजीराव भोसले यांना यावर्षीचा शेतीनिष्ठ शेतकरी गंगाई बाबाजी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या या निवडीमुळे शेतकरी वर्गासह सर्वच क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

इंजिनिअर शहाजीराव भोसले यांनी अभियांत्रिकी शिक्षणाचा उपयोग शेती क्षेत्रात प्रभावीपणे करत आधुनिक तंत्रज्ञान, शास्त्रीय पद्धती व पारंपरिक शेतीचा समतोल साधला आहे. कमी खर्चात अधिक उत्पादन, पाणी व्यवस्थापन, ठिबक सिंचन, सेंद्रिय खतांचा वापर, माती परीक्षणावर आधारित पिकांची निवड तसेच बहुपीक पद्धती यशस्वीपणे राबवून त्यांनी इतर शेतकऱ्यांसमोर आदर्श उभा केला आहे.

त्यांनी रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय व नैसर्गिक शेतीला प्राधान्य दिले. त्यामुळे उत्पादन वाढीसोबतच जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासही मोठी मदत झाली आहे. त्यांच्या शेतीतून मिळणारे दर्जेदार उत्पादन बाजारात चांगला भाव मिळवत असून अनेक तरुण शेतकरी त्यांच्या मार्गदर्शनाखाली शेतीकडे वळत आहेत.

शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण व्हावे, शेती हा तोट्याचा व्यवसाय नसून योग्य नियोजन व आधुनिकतेच्या आधारे तो नफ्याचा होऊ शकतो, हा संदेश इंजिनिअर शहाजीराव भोसले सातत्याने देत आहेत. शेतीविषयक प्रशिक्षण शिबिरे, मार्गदर्शन वर्ग, अनुभव कथन आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून त्यांनी अनेक शेतकऱ्यांना प्रेरणा दिली आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन गंगाई बाबाजी पुरस्कार समितीने त्यांची निवड केली आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचा सन्मान तर झाला आहेच, सोबतच शेती क्षेत्रात नाविन्यपूर्ण प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्यांना नवी दिशा मिळाली आहे. या पुरस्काराबद्दल इंजिनिअर शहाजीराव भोसले यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

## पान ६ वरुन...

### बीड नगर पालिकेच्या

माहिती दिली आणि पक्ष सूचनेप्रमाणे आणि बीड शहरातील सामाजिक, राजकीय अभिसरण लक्षात घेता फारुक पटेल यांची निवड केल्याचे त्यांनी घोषित केले. त्यानंतर गटनेते व नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रशासकीय कार्यवाही पूर्ण केली.

शिव-शाहू-फुले-आंबेडकर आघाडी नाही बांधिलकी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिव-शाहू-फुले-आंबेडकर हा विचार घेऊनच पक्ष संघटन आणि निवडणुकांच्या प्रक्रियात काम करत आला आहे. बीड शहरात विजयी उमेदवारांची आघाडी स्थापन करताना देखील आ. विजयसिंह पंडित यांनी आघाडीचे नामांकरण शिव-शाहू-फुले-आंबेडकर असे सुचवले. यावर प्रतिक्रिया देताना हे केवळ आघाडीचे नाव नसून आमच्या पक्षाची सामाजिक आणि राजकीय बांधिलकी असल्याचे आ. पंडित यांनी म्हटले.

### गेवराईच्या सामाजिक व

सौ गीताभाभी पवार यांनी स्पष्ट सांगितले. गेवराई नगर परिषद निवडणुकीमध्ये माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित आणि त्यांचे सर्व कुटुंबीय यांच्यासोबतच, माजी आ लक्ष्मणराव पवार, बाळराजे दादा पवार आणि गेवराईकरांनी भरभरून साथ दिल्याने ५ हजार पेक्षा अधिक मतांनी आपण विजयी झाल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले.

### शेतात जात असताना

संध्याकाळनंतरही वडील घरी न परतल्याने त्यांचा मुलगा व काही ग्रामस्थ शोधासाठी गेले असता, मच्छिंद्र उबाळे हे तुटलेल्या वीज तारेजवळ मृतावस्थेत आढळून आले. यानंतर गावकऱ्यांनी तातडीने पोलिसांना घटनेची माहिती दिली.

घटनास्थळी पोलिसांनी दाखल होऊन पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाटोदा येथील रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक मिसाळ व पवळ हे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत. या घटनेमुळे सौताडा गावात शोककळा पसरली आहे

### शुक्ल तिर्थ लिमगाव येथील

अंतराळ व गर्भगृह अशी आहे.मंदिरातील रंगशिळेचे आठही स्तंभअलंकृत आहेत. सभामंडपात दोन देवकोष्टक असून दक्षिणेकडील कोष्टकात सरस्वती व उत्तरेकडील कोष्टकात नागदेवतेची प्रतिमा आहे.सदर मंदिराचे स्थापत्य व शिल्पकला चालुक्यकालीन कला व स्थापत्यशास्त्राचा उत्तम नमुना आहे.मंदिराची लांबी ३०.०० मीटर व रुंदी ११.४९८ मीटर एकुण क्षेत्रफळ ३४४.८४ चौरस मीटर असुन हे मंदिर राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित होण्यासाठी आ.प्रकाश सोळंके यांनी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता, त्यासाठी आ.सोंळके यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने राज्य शासनाने शुक्ल तिर्थ लिमगाव येथील श्री महाविष्णू मंदिराला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्याची राज्य सरकारने अधिसूचना दि २९ डिसेंबर २०२५ सोमवार रोजी शासन निर्णयानुसार काढली आहे.त्यामुळे शुक्ल तिर्थ लिमगाव येथील सरपंच कृष्णा थावरे यांच्यासह ग्रामस्थांनी आ.प्रकाश सोळंके यांचा सत्कार करुन त्यांचे आभार मानले आहेत.

### खोटी व बनावट नावे लावून

खोटे बनावटी लोकांची नावे समाविष्ट करण्यात आलेली आहे.तसेच नाशिक, पाथरी,पात्रुड, माजलगाव, परभणी आदी सह ग्रामीण भागातील बेकायदेशीर लोकांची नावे व जे लोक सदरील प्रभागामध्ये राहत नाहीत व त्यांचा या भागाशी कुठल्याही प्रकारे संबंध नाही त्यांच्या देखील नावाचा उल्लेख करुन बोगस नावे लावली. तसेच एकाच माणसाने अनेक लोकांची नावे लावली त्यांच्याकडे आधारकार्ड देखील उपलब्ध नाही केवळ खोटे व बोगस नावाची नोंद यादीमध्ये घेण्यात आले. त्यांचा मोठा परिणाम नुकत्याच सन २०२५ निवडणुकीमध्ये झालेला आहे. बोगस मतदान कार्ड दलालाच्या हातात देवुन दलालाच्या सहाय्याने तहसिल मध्ये देवुन खोटी नावे लावली. तसेच वरील नावाबाबतचा आक्षेप आताच्या सन २०२५ च्या निवडणुकीच्यावेळी सुशांत पौळ यांनी घेतला होता. परंतु त्यांचा आक्षेप देखील दाबुन टाकण्यात आला. तसेच निवेदकाने देखील तोंडी आक्षेप घेतला होता. परंतु यांचा देखील कोणताही आक्षेप व बाजु ऐकुन न घेता त्यावेळी तेथे निवडणुक अधिकारी व मुख्याधिकारी स्वतःआले होते व चर्चा देखील झाली. वरील बेकायदेशीर नावामुळे सन २०२५ च्या नगर परिषदच्या निवडणुकीवर परिणाम झाला. सदर परिणाम हा नगरअध्यक्ष व दोन नगरसेवक यांच्यावर झाला. निवडणुक अधिकारी यांच्या नियमानुसार तात्काळ कार्यवाही करून त्यांना कडक शासन झाले पाहिजे या साठी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व आंबेडकरी विचार मोर्चा ,आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा चे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी ॲड सय्यद अल्ताफ ,शेख इमू,सय्यद बाबू,मिरझा माहेमुद बेग,शेख माहेमुद , यांच्या सह आपल्या असंख्य कार्यकर्ते समवेत आमरण उपोषण सुरू केले आहे

### शाहीरी जलशातून सामाजिक

यांचा सुंदर संगम साधत नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या नवयान महाजलशातून घडले, अशी भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली.हा शाहीरी जलसा केवळ मनोरंजन न राहता सामाजिक जाणीव जागवणारा ठरला असून, लोककलेच्या ताकदीने इतिहास आणि परिवर्तनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आयोजक व कलाकार यशस्वी ठरले. यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे, अँड रत्नदीप निकाळजे, प्राचार्य वाघ सर, प्राचार्य हरीदास विधाते सर, अशोक साळवे राजेंद्र धोंडे भाऊसाहेब लटपटे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, हरीभाऊ जंजीरे. पत्रकार शरद रेडेकर, गणेश दळवी,आविशांत कुमकर, आण्णा साबळे, प्रा टाळके, वैद्य,पाचे,गावडे, हजारे,पोकळे आदी सह प्रक्षेक उपस्थित होते.

## पाचशे किलो तारेसह तिघे पोलिसांच्या ताब्यात; गुन्हे अन्वेषण विभागाची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील वासनवाडी शिवारातील तार चोरी करणाऱ्या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून जवळपास ५०० किलो अल्युमिनियमची तार जप्त करण्यात आली आहे. ही कामगिरी गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी केली.

पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीतील वासनवाडी शिवारातील सर्वे नं. १६० मधील चोरी गेलेली ॲल्युमिनियम तार ही हिस्ट्रीशिटर सराईत गुन्हेगार भिमा लक्ष्मण मस्के रा. बलभिमनगर, वतार वेस बीड याने व त्याचे टोळीने केली आहे.अशी खात्रीलायक माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १) भिमा लक्ष्मण मस्के, वय ३९ वर्षे रा. बलभिमनगर, वतार वेस बीड २) विजय वसंत तायड वय २५ वर्षे, रा. माऊलीनगर, बीड ३) हुसेन बशीर शेख वय ४५ वर्षे, रा. पावर हाऊस जवळ, माऊलीनगर, बीड यांना सापळा रचून बीड शहरातून ताब्यात घेतले. त्यांचेकडे तपास केल्यानंतर त्यांनी खालील गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले.

१) पो.स्टे.बीड ग्रामीण गु.र.नं. ३९८/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. २) माजलगाव ग्रामीण



गु.र.नं.४२६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. वरील आरोपींकडून चोरी केलेली एकूण ५०० किलोची ॲल्युमिनियम तार स्थानिक गुन्हे शाखेने जप्त करून आरोपीसह जप्त तार ही पुढील तपास पोलीस स्टेशन बीड ग्रमीणच्या ताब्यात दिली आहे. दिनांक २८/१२/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने १) विरसिंग शेरसिंग गोके, वय २४ वर्षे, रा. पोलीस कॉलनी शेजारी, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई जि. बीड २) मोहनसिंग मोहब्बतसिंग टाक, वय २१ वर्षे, रा. बसस्टँडच्या पाठीमागे, वडवणी ता. वडवणी जि.बीड ३) जिगरसिंग मोहब्बतसिंग टाक, वय १९ वर्षे, रा. बसस्टँडच्या पाठीमागे, वडवणी ता. वडवणी जि. बीड यांना वडवणी येथून ताब्यात घेऊन त्यांनी केलेल्या चार घरफोडी व दोन चोरी गुन्हे निष्पन्न केले. या आरोपीकडून खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) पो.स्टे.धारुर गु.र.नं. ४५८/२०२५ कलम ३३१ (४), ३०५ (अ), ३ (५) भा. न्या.सं. २) पो.स्टे.धारुर गु.र.नं. ४५२/२०२५ कलम ३३४ (२), ३०५ (अ) भा.न्या.सं. ३) पो.स्टे. अंबाजोगाई शहर गु.र.नं.५६६/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. ४) पो.स्टे. अंबाजोगाई ग्रामीण गु.र.नं.४१२/२०२५ कलम ३०३(२) भा.न्या.सं. ५) पो.स्टे.नेकनूर गु.र.नं.३५८/२०२५ कलम ३३१ (४), ३०५ (अ) भा.न्या.सं. ६) पो.स्टे. संभाजीनगर, परळी गु.र.नं. १५४/२०२५ कलम ३३१(४),३०५,३३३ भा.न्या.सं. अल्युमिनियम तार, पानबुडी मोटारी चोरणाऱ्या वेगवेगळ्या दोन टोळ्या पकडल्याने मागील दोन दिवसात स्थानिक गुन्हे शाखेने वरील चार घरफोडी व चार चोरीचे गुन्हे उघड केले आहे. वरील आरोपींकडून कॉपर केबलचे तीन बंडल, पानबुडी व बोरच्या ६ मोटार, पाच शेळ्या असा एकूण ३,२१,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमाल व आरोपी पुढील तपास कामी पो.स्टे. धारुर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहेत.

सदरील कामगिरी ही नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार रामचंद्र केकान, मारोती कांबळे, सोमनाथ गायकवाड, विष्णू सानप, पोलीस नाईक गोविंद भताने, पोलीस अंमलदार सचिन आंधळे, विकी सुरवसे, चालक पोलीस हवालदार अतुल हराळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी केली आहे.

## माजलगावात श्रीमद् भागवत कथा व किर्तन महोत्सव

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासुन जवळच असलेल्या संत ज्ञानेश्वर नगर, नविन वसाहत भाटवडगाव येथे श्री संत ज्ञानदेव सं. वि. गुरूकुल माजलगाव यांच्या वतीने श्रीमद्? भागवत कथा व किर्तन महोत्सव तथा ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाचे आयोजन दि. १ ते ८ जानेवारी दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती आयोजक ह. भ. प. शिवाजी महाराज गडदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



या भागवत कथा व किर्तन महोत्सवात सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दु. २ ते ५ यावेळेत श्रीमद्? भागवत कथा, रात्रो ८ ते १० किर्तन होणार आहे. ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व सुनिता ठेंग चिकलीकर, हरिपाठ नेतृत्व रमाकांत म. हारकाळ, रघुनाथ माने, उमेश हाके हे करणार आहेत. कथाकार ह. भ.प. भागवताचार्य सचिन महाराज काष्टे हे असुन सिंधवादक गोविंद महाराज नायबळ, सोमेश महाराज जगताप हे तर तबल्यावर राम महाराज जामखेडकर साथ देणार आहेत. दि. ८ जानेवारी ह. भ. प. प्रकाश महाराज साठे यांच्या काल्याच्या किर्तनाने हरिनाम सप्ताहाची सांगता होणार असुन या कथा व किर्तन श्रवणाचा भावीक - भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक ह. भ. प. शिवाजी महाराज गडदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## बंगाली पिंपळा येथील होम मिनिस्टर कार्यक्रमाला महिलांचा मोठा प्रतिसाद

### महिलांच्या आनंदासाठी होम मिनिस्टर कार्यक्रम गावागावात घेऊ- ह.भ.प. परमेश्वर महाराज वाघमोडे

मादळमोही । प्रतिनिधी

होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळे दिनांक २८ डिसेंबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प. परमेश्वर महाराज वाघमोडे व उपस्थित महिला आणि सरपंच तुकाराम तळतकर, पत्रकार संतोष भारती, बाजार समितीचे संचालक अशोक खरात आणि माजी सरपंच महादेव कारंडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात आमदार विजयसिंह पंडित यांनी दूरध्वनी द्वारे संवाद साधून उपस्थित महिलांना कार्यक्रमाच्या शुभेच्छा दिल्या. महिलांना आपल्या हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी व महिलांना विविध खेळ, प्रबोधन, आरोग्य विषयक माहिती अशा कार्यक्रमासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प. परमेश्वर महाराज वाघमोडे यांनी आपल्या विचार व्यक्त करताना महिलांच्या आनंदासाठी विविध गावात होम मिनिस्टर कार्यक्रम घेऊ असे बोलताना आपले मनोगत व्यक्त केले. होम मिनिस्टर कार्यक्रमाचे निवेदक सुशील टकले यांनी उपस्थित लहान मुलांसह महिलांचे विविध खेळ घेऊन मनोरंजनात्मक कार्यक्रम केला. अनेक बक्षिसांचा वर्षाव करीत कोण होणार होम मिनिस्टर या कार्यक्रमाला महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला.

गेवराई तालुक्यातील बंगाली पिंपळा येथे गावकऱ्यांच्या वतीने आगामी संक्राती सणाच्या निमित्ताने महिलांसाठी दिनांक २८ नोव्हेंबर



रविवार रोजी सायंकाळी जिल्हा परिषद शाळा येथे भव्य होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महिला सरपंच व मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आली. उपस्थित महिलांसाठी अनेक बक्षिसांचा वर्षाव करीत सुशिल टकले प्रस्तुत कोण होणार होम मिनिस्टर हा कार्यक्रम घेण्यात आला. महिलांना आपल्या हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी व महिलांना विविध खेळ, प्रबोधन, आरोग्य विषयक माहिती अशा कार्यक्रमासाठी सतत प्रयत्नशील असणाऱ्या प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प. परमेश्वर महाराज वाघमोडे यांनी आपल्या विचार व्यक्त करताना महिलांच्या आनंदासाठी विविध गावात होम मिनिस्टर कार्यक्रम घेऊ असे बोलताना आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात महिलांचे विविध प्रकारचे खेळ घेण्यात आले. उखाणा स्पर्धा, फुगा फोडणे स्पर्धा, जनरल नॉलेज स्पर्धा, संगीत खुर्ची, रस्सीखेच, तळ्यात मळ्यात, फुगा फुगवणे, उखाणा घेणे, मोर पिसारा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या या सर्व स्पर्धांमध्ये महिलांनी भरभरून प्रतिसाद देत प्रत्येक खेळात आपली उपस्थिती दर्शवली. होम मिनिस्टर कार्यक्रमाचे निवेदक सुशिल टकले यांच्या बहारदार निवेदनाने प्रत्येक कार्यक्रमात रंगत आली. अनेक क्षेत्रातील महिला या कार्यक्रमात सहभागी झाल्या व विविध प्रकारचे खेळ महिलांनी या ठिकाणी आपला सहभाग नोंदवत खेळले. या कार्यक्रमातील विजेत्या महिलांना बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या होम मिनिस्टर ठरलेल्या महिला यांना जम्बो कुलर देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुंदर असे आयोजन प्रमुख मार्गदर्शक ह.भ.प. परमेश्वर महाराज वाघमोडे, सरपंच तुकाराम तळतकर, पत्रकार संतोष भारती, बाजार समितीचे संचालक अशोक खरात आणि माजी सरपंच महादेव कारंडे यांनी केले तर गावातील सर्व महिला व पुरुषांचा उत्कृष्ट सहभाग लाभला या बहारदार कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन सुशिल टकले सर यांनी करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

वाघमोडे सरांच्या माध्यमातून सामाजिक कार्यक्रमावर भर

परमेश्वर वाघमोडे महाराज यांच्या माध्यमातून चंकलंबा गटात गेली चार वर्षापासून सामाजिक व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, त्यामुळे सतत सामाजिक कामात अग्रेसर असणारे व्यक्तीमत अशी त्यांची ओळख आहे,

cmyk

# यवतमाळ जिल्ह्यात वर्षभरात ३४२ शेतकऱ्याच्या आत्महत्या

यवतमाळ : पांढरं सोनं' पिकवणारे शेतकरी अशी यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना म्हंटल जाते यामागचं कारण म्हणजे यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर कापसाचे उत्पादन करतात. कापूस हा आपल्या देशात अत्यंत मौल्यवान, फायदेशीर नगदी पीक मानला जातो. आणि हे पीक विदर्भातील शेतकऱ्याच्या आर्थिक उत्पन्नाचा मोठा आधार आहे. मात्र हाच पांढरे सोनं पिकवणारा शेतकरी आज आत्महत्येच्या विळख्यात अडकलाय. २०२५ या वर्षांत गेल्या ३३४ दिवसांमध्ये तब्बल ३४२ शेतकरी आत्महत्या झाल्या असून दिवसाला एक आत्महत्या झाल्याचे आकडेवारीतून दिसून येते.

सरकारी आकडेवारीनुसार, यवतमाळमध्ये १ जानेवारी २००१ पासून ३१ ऑगस्ट २०२३ पर्यंत ५,६१० शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. २०२४ सालच्या पहिल्या दोन महिन्यांत महाराष्ट्रात ४२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यापैकी सर्वाधिक



४८ आत्महत्या यवतमाळमधील आहेत. २०२५ मध्येही शेतकरी आत्महत्येचा प्रश्न मिटला नाही.यावर्षीही यवतमाळ जिल्ह्यात ३३४ दिवसांमध्ये तब्बल ३४२ शेतकऱ्यांनी आपले जीवन संपवले.

यवतमाळमध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकरी आत्महत्या होण्याचं एक कारण इथल्या शेतकऱ्यांचं बिघडत चाललेलं अर्थकारण म्हणता येईल. यावर्षी विदर्भात पावसाने हाहाकार केला. अतिवृष्टीने तब्बल सहा लाख हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली. अनेक पिके वाहून गेली.

काही पीक शिल्लक राहिली त्याची गुणवत्ता ढासळली, त्यामुळे पिकांना योग्य हमीभाव मिळाला नाही. पीक विम्याची पैसेही वेळेवर शेतकऱ्यांना मिळत नाही. हमीभावाने खरेदी होत नाही. हाती आलेल्या पिकांना भाव नसल्याने लागवडीचा खर्चही यंदा निघाला नाही.

नापिकी, बोगस बियाणे, कीटकनाशके, पीककर्ज, हमीभाव, सावकारी कर्ज इत्यादी कारणातून शेतकरी अडचणीत आला. त्यातूनच शेतकरी हतबल झाला, आणि आत्महत्येचे सत्र सुरू झाले. शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सरकार काय उपाययोजना करत ते पाहायला हवे.

## शेतकरी ओळखपत्र आणि त्याचे महत्व



पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांनाही फार्मर्स आयडी म्हणजे शेतकरी ओळखपत्र अनिवार्य केले आहे. हे ओळखपत्र नसेल तर शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा २२ वा हप्ता मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण असून, हे ओळखपत्र नेमके आहे तरी काय? ते कसे काढावे याबाबत अनेक शेतकऱ्यांना माहिती नाही. मात्र पीएम किसान योजनेचे लाभार्थी आहात आणि शेतकरी ओळखपत्र काढायचे असेल तर याबाबत माहिती असने आवश्यक आहे.

शेतकरी ओळखपत्र म्हणजे काय? : शेतकरी ओळखपत्र म्हणजेच काय तर फार्मर्स आयडी. फार्मर आयडी हे शेतकऱ्यांचे डिजिटल प्रोफाईल आहे. सरकारकडून शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या योजनांचा फायदा घेण्यासाठी ही ओळख अतिशय महत्वाची आहे. हे एक युनिक ओळखपत्र आहे ज्याच्या आधारे शेतकऱ्याला कोणती योजना लागू होते, किती सबसिडी मिळू शकते, याबद्दल सगळी माहिती समजते.

शेतकरी ओळखपत्र मिळविण्याची पद्धत : शेतकरी नोंदणी पोर्टलला भेट द्या. तुमचा मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी टाका आणि खाते सत्यापित करा. त्यानंतर आधार क्रमांक, सातबारा उताऱ्यातील माहिती, जिल्हा, तालुका, गाव, सर्व्हे नंबर, गट नंबर अशी सर्व माहिती भरा म्हणजे ओळख पत्र मिळणे सोपे होवून जाईन.आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक खात्याचे तपशील. अर्ज मंजूर झाल्यानंतर डिजिटल फार्मर आयडी कार्ड डाउनलोड करा.

शेतकरी ओळखपत्राची गरज का : पीएम किसान योजनेत अलीकडच्या काळात अनेक ठिकाणी चुकीची नोंदणी, अपूर्ण कागदपत्रे आणि अपात्र लाभार्थी यांची संख्या वाढल्याचे आढळून आले होते. याच पार्श्वभूमीवर सरकारने शेतकरी ओळखपत्र अनिवार्य केलं आहे. शेतकरी ओळखपत्रामुळे पीएम किसान योजनेतील लाभार्थ्यांची अचूक ओळख पटेल, तसेच एकाच शेतकऱ्याने वेगवेगळ्या नावाने किंवा चुकीच्या नोंदींमुळे डबल फायदा घेण्याची शक्यता थांबेल. डिजिटल प्रणालीमुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण माहितीपत्रक एका व्यासपीठावर उपलब्ध राहणार आहे. म्हणजेच काय तर शेतकरी ओळखपत्रामुळे सरकार शेतीशी संबंधित इतर योजनांनाही एकत्रित डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणू शकेल.

## पीक उत्पादनवाढीमध्ये मुळीचे महत्व

वनस्पतींना किंवा पिकांना एकुण दोन प्रकारच्या मुळ्या असतात. एक पांढरी मुळी आणि दुसरी काळी किंवा लालसर रंगाची मुळी या दोन मुलांचे वेगवेगळे फायदे व गुणधर्म आहे ते आपण समजून घेऊयात.

पांढरी मुळी : पांढरी मुळी ही वनस्पतीचा मुख्य भाग आहे.या मुळीस काही ठिकाणी केशमुळ देखिल म्हणतात. ह्या मुळीचा शेंड्याकडील बराच भाग हा पांढरा असतो. म्हणून ह्या मुळीला पांढरी मुळी म्हणतात. ह्या मुळीचे मुख्य कार्य म्हणजे जमिनितील अन्न व पाणी शोषणे होय. म्हणून या मुळीस वनस्पतीचे खाणारे तोंडदेखिल म्हणतात.

ज्या पिकामध्ये पांढरया मुळांची संख्या जास्त म्हणजे खाणारी तोंडे जेवढी जास्त तेवढ़े त्या पिकांची उत्पादन जास्त व पिके सुदृढ असतात.अशा पीकामध्ये रोग प्रतिकारशक्ती जास्त असते. वनस्पतींच्या पांढरी मुळीच्या तोंडाजवळ जेवढे अन्न किंवा खत येईल तेवढेच खत किंवा अन्न सदर मुळी शोषण करीत असते. दूरचे अन्न किंवा खत सदर मुळ शोषून घेऊ शकत नाही म्हणून जेवढया पिकास पांढरया मुळ्या जास्त तेवढे पिक जास्त अन्न शोषण करीत असते व तेवढे पिक सशक्त व पिकांचे उत्पन्न जास्त असते.

काळी मुळी : या काळ्या मुळीस काही ठिकाणी निबर किंवा कठिण मुळी म्हणतात. काळी मुळी ही पांढरया मुळीच्या आकाराच्या मानाने बरयाच मोठया असतात. वेगवगळया वनस्पतिमध्ये या मुळांचा रंग वेगवेगळा असतो. या मुळांचे मुख्ये काम पुढीलप्रमाणे असते. पांढऱ्या मुळीने शोषलेले अन्न हे वनस्पतीच्या किंवा पिकांच्या पानाकडे पाठवणे. वनस्पतीला किंवा पिकांना मातीशी घट्ट धरून ठेवणे, पिकास किंवा वनस्पतीस आधार देण्याचे मुख्य कार्य या काळ्या मुळ्या करित असतात.

मुकुटमुळी : पिकामध्ये किंवा वनस्पतीमध्ये सुरुवातीस सुटणारया मुळांना जेटमुळ किंवा सोटमुळ म्हणतात. पिकामध्ये लागणीनंतर काही दिवसांनी फुटवे येतात व त्या फुटव्यांना मुळ्या सूटतात. अशा फुटव्यांच्या सूटलेल्या मुळ्यांना मुकुटमुळी म्हणतात. कार्य :

पिकांची मुकुटमुळ ही जमिनितील अन्न किंवा खत व पाणी शोषूण त्या त्या फुटव्यांना उपलब्ध करून देतात. यामुळे प्रत्येक फुटवा हा एकसारखा वाढण्यास मदत होते. यामुळे आपल्याला सर्व फुटवे लाभतात व उत्पन्नामध्ये प्रचंड वाढ होते.



## सुक्ष्मजीवांमुळे पिके होतात रोगमुक्त

बायोमिक्स हे १४ उपयुक्त सूक्ष्मजीवांचे जैव मिश्रण हळद, अद्रकसह विविध पिकांमध्ये रोगनियंत्रण, जोमदार वाढ आणि उत्पादनवाढीसाठी प्रभावी ठरत आहे. संशोधनातून सर्व पिकांसाठी उपयुक्त ठरलेले हे मिश्रण शाश्वत शेतीसाठी नवे आशास्थान बनले आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील वनस्पती रोगशास्त्र विभागाने विकसित केलेले बायोमिक्स हे १४ उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संशोधनात्मक मिश्रण शेतकऱ्यांसाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे. पिकांवरील विविध रोगांचे नियंत्रण, मृदाजन्य किडींपासून संरक्षण तसेच जमिनीतून अन्नद्रव्यांची उपलब्धता वाढविण्याचे काम हे जैव मिश्रण प्रभावीपणे करते, असे विद्यापीठाच्या संशोधनातून सिद्ध झाले आहे. बायोमिक्समध्ये रोगनियंत्रण करणाऱ्या बुरशी व जीवाणूंसह पिकांना अन्नद्रव्य उपलब्ध करून देणारे सूक्ष्मजीव समाविष्ट आहेत. आतापर्यंत झालेल्या संशोधनानुसार हे मिश्रण सर्वच पिकांसाठी उपयुक्त असून विशेषतः हळद व अद्रक पिकामध्ये लागवडीपासूनच त्याचा वापर करता येतो.

उगवण लवकर, पीक जोमदार : हळद व अद्रक लागवडीपूर्वी बेणे प्रक्रिया किंवा बिजोत्तेजन केल्यास सर्वसाधारण वेळेपेक्षा उगवण लवकर होते. यामुळे पिकाची सुरुवातच जोमदार होऊन उत्पादनात वाढ होण्यास मदत होते.

बायोमिक्स वापराचे प्रमुख फायदे : कंदकुज



व इतर मृदाजन्य रोगांपासून संरक्षण. हुमणी, कंदमाशी, खोडकीड यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव कमी. कंदवर्गीय पिकांमध्ये कंदाचा आकार, संख्या, लांबी व व्यास वाढतो. पांढऱ्या मुळांची जोमदार वाढ होऊन अन्नद्रव्यांचा चांगला पुरवठा. जमिनीत अनुपलब्ध अन्नद्रव्य उपलब्ध होण्यास मदत. पानांवरील ठिपके व करपा रोगांचा प्रादुर्भाव कमी. सूत्रकृमींपासून संरक्षण. उत्पादन, उत्पादकता व दर्जात लक्षणीय वाढ. हळदीमध्ये वाळलेल्या हळदीचा उतारा वाढतो तसेच करक्युमीनचे प्रमाण अधिक मिळते.

कंद प्रक्रिया : १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम किंवा २०० मिली बायोमिक्स मिसळून द्रावण तयार करावे. लागवडीसाठी निवडलेले कंद ३० ते ६० मिनिटे या द्रावणात बुडवून सावलीत सुकवून लागवड करावी.

बिजोत्तेजन : १०० लिटर पाण्यात २ किलो किंवा २ लिटर बायोमिक्स मिसळून द्रावण तयार करावे. बेणे रात्रभर भिजत ठेवून दुसऱ्या दिवशी सुकवून लागवड करावी.

एकरी प्रमाण : ५ किलो किंवा ५ लिटर (४ किलो/लिटर आळवणीसाठी व १ किलो/लिटर फवारणीसाठी)

आळवणी : २०० लिटर पाण्यात ४ किलो किंवा ४ लिटर बायोमिक्स मिसळून ठिबक सिंचनाद्वारे किंवा पंपाने आळवणी करावी.

फवारणी : १० लिटर पाण्यात १०० ग्रॅम किंवा १०० मिली या प्रमाणात फवारणी करावी.

कोणत्या पिकांसाठी उपयुक्त? हळद, अद्रक, सोयाबीन, कापूस, मोसंबी, संत्रा, लिंबू, डाळिंब, टरबूज, मिरची, वांगे, पपई, तूर, हरभरा, केळी, द्राक्षे आदी पिकांसाठी बायोमिक्स उपयुक्त आहे.

वापरताना घ्यावयाची काळजी : बायोमिक्सचा वापर रासायनिक घटकांसोबत करू नये. थंड व कोरड्या जागेत साठवण करावी. वापराच्या वेळी जमिनीत ओलावा असावा. वापरण्यापूर्वी व नंतर ४५ दिवस रासायनिक खते किंवा कीटकनाशकांचा वापर टाळावा. शाश्वत शेती, कमी खर्चात अधिक उत्पादन आणि मातीचे आरोग्य जपण्यासाठी बायोमिक्सचा वापर शेतकऱ्यांसाठी प्रभावी ठरत असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे.

## दिन विशेष



### महत्वाच्या घटना

१६०० : ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीची स्थापना
१७८१ : अमेरिकेमध्ये अमेरिकेची पहिली बँक ऑफ उत्तर अमेरिका उघडली.
१८०२ : इंग्रज व दुसरा बाजीराव यांच्यात वसईचा तह झाला या तहात पेशव्यांचा बराच भूभाग इंग्रजांच्या अधिपत्याखाली गेला.
१८७९ : थॉमस एडिसनने मेन्लो पार्क, न्यू जर्सी येथे प्रथमच विद्युत दिव्यांचे प्रात्यक्षिक दाखवले.
१९२९ : महात्मा गांधीआणि काँग्रेस च्या कार्यकर्त्यांनी लाहोर मध्ये पूर्ण स्वराज साठी आंदोलनाला सुरुवात केली.
१९४४ : दुसरे महायुद्ध हंगेरीने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९५५ : जनरल मोटर्स वर्षातून १ अब्ज अमेरिकन डॉलर्सची कमाई करणारी पहिली अमेरिकी कंपनी बनली.
१९९७ : मोहम्मद रफ़ीक तरार पाकिस्तान चे नववे राष्ट्रपती बनले.
१९८५ : युनायटेड किंग्डम ने युनेस्कोचे सदस्य बनले.
१९८४ : राजीव गांधी हे भारताचे सातवे प्रधान मंत्री बनले.
१९९९ : बोरिस येल्त्सिन यांनी रशियाच्या राष्ट्राध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
१९९९ : पनामा कालव्यावर पनामा (देशा) चे पूर्ण नियंत्रण आले. त्याआधी काही वर्षे या कालव्यावर अमेरिका व पनामा यांचे संयुक्तपणे नियंत्रण होते.
२००४ : त्याकाळी जगात सर्वात उंच असलेल्या (१६७० फूट), तैपेइ १०१ या इमारतीचे उद्घाटन झाले.
२००८ : ईश्वरदास रोहिणी यांना दुसऱ्यांना मध्य प्रदेश च्या विधानसभेचे अध्यक्ष बनविण्याची घोषणा करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७१ : गजानन यशवंत ताम्हणे तथा माणिकराव आधुनिक भारतीय व्यायामविद्येचे प्रवर्तक, 'कन्या आरोग्य मंदिरा'चे संस्थापक, बडोद्याचे मल्लविद्या विशारद (मृत्यू: २५ मे १९५४)
१९१० : पं. मल्लिकार्जुन मन्सूर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, (ग्वाल्हेर घराण्याचे पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे शिष्य) नीलकंठबुवा अलुरमठ आणि (जयपूर घराण्याचे अध्वर्यू उस्ताद अल्लादियाँ खाँ यांचे पुत्र) मंजी खाँ व भुर्जी खाँ असे तीन गुरू त्यांना लाभले, पद्?मविभूषण व कालिदास सन्मान आदी मानसन्मान त्यांना मिळाले. (मृत्यू: १२ सप्टेंबर १९९२)
१९२५ : भारतीय लेखक श्री लाल शुक्ला यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑक्टोबर २०११)
१९३४ : भारतीय लेखक, कवी आणि विद्वान अमीर मुहम्मद अकरम अववान यांचा जन्म.
१९३७ : अँथनी हॉपकिन्स वेल्श अभिनेता
१९४७ : सुप्रीम कोर्टचे माजी न्यायाधीश स्वातंत्र कुमार यांचा जन्म.
१९४८ : डोना समर अमेरिकन गायिका (मृत्यू: १७ मे २०१२)
१९५१ : लोकसभेचे सदस्य अरविंद सावंत यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८६ : केंद्रीय आरोग्य मंत्री राजनारायण यांचे निधन.
१८९८ : बिहार चे माजी मुख्यमंत्री कृष्णा बल्लभ सहाय यांचा जन्म.
१९२६ : वि. का. राजवाडे इतिहासाचार्य (जन्म: १२ जुलै १८६३)
१९५६ : मध्य प्रदेश चे माजी मुख्यमंत्री यांचे निधन.
१९७१ : डॉ. विक्रम साराभाई भारतीय अवकाश संशोधन कार्यक्रमाचे शिल्पकार (जन्म: १२ ऑगस्ट १९१९)
१९९३ : जॉर्जियाचे पहिले अध्यक्ष झवेद गमझखुर्डिया यांचे निधन. (जन्म: ३१ मार्च १९३९)
१९९७ : 'स्वरराज' छोटा गंधर्व (जन्म: १० मार्च १९१८)
२००१ : भारतीय लेखक टी. एम. चिदंबरा रघुनाथन यांचे निधन.

## शेतातील सोलर पॅनलची सफाई करताना अशी घ्या काळजी



कृषी विभागाच्या माध्यमातून मागेल त्याला सोलर ही योजना राबवली जाते. त्यामुळे गेल्या काही वर्षात अनेक शेतकऱ्यांना आपल्या शेतात सोलर प्लांट बसवला आहे. ही सोलर प्लांटची हाताळणी करताना अनेकदा काळजी घ्यावी लागते. अनेकदा धुळीने सोलर काचा खराब होत असतात, अशावेळी साफसफाई करताना विशेष काळजी घ्यावी लागते. कारण एक चूक महागात पडू शकते. त्यामुळे सर्व सोलर धारकांनी सतर्क व सजग राहणे आवशयक आहे.

सोलर पॅनेलमध्ये वीज (करंट) सतत तयार होत असते. दिवसा सूर्यप्रकाशात ती पूर्णपणे ॲक्टीव्ह असते. जर हात ओले असतील, कपडे ओले असतील किंवा वायरिंगमध्ये काहीतरी गडबड असेल तर लगेचच शॉक लागतो आणि तो शॉक खूप जास्त धोकादायक असतो. डीसी करंटमध्ये हात पकडला गेला तर तो सुटत नाही. म्हणूनच सोलर प्लेट सफाई करताना काही बाबी लक्षात ठेवायला हव्यात. सकाळी लवकर किंवा संध्याकाळीच साफ करा. सोलर डिस्कनेक्ट स्विच बंद करूनच सफाई करा. ओले कपडे, ओले हात वापरू नका. लोखंडी ब्रश किंवा हाताने थेट पॅनेलला स्पर्श करू नका. रबरचे ग्लोव्हज वापरा. मुलांना सोलर सिस्टिमपासून दूर ठेवा. दर सहा महिन्यांनी वायरिंग आणि कनेक्शन तज्ज्ञांकडून तपासून घ्या. लक्षात ठेवा सोलर वापरणं फायद्याचं आहे, पण योग्य काळजी घेतली तरच. जरा चुकीनं हाताळलं, की जीव धोक्यात येतो. त्यामुळे सर्व शेतकरी व सोलर वापरणाऱ्यांनी काळजी घेण्याची गरज आहे.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत





# जालना मनपा निवडणूक सर्व मतदान केंद्रावर असणार सीसीटीव्ही कॅमेरे-आशिमा मित्तल

जालना। प्रतिनिधी

जालना महानगरपालिका चे निवडणूक महानगरपालिका स्थापन झाल्यापासून पहिलीच निवडणुकी होत आहे. महानगरपालिका ची निवडणूक पारदर्शक प्रमाणे होण्याकरता सर्व मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचा प्रयत्न सुरू आहे या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे काही अनुचित घटनेस आळा बसू शकतो यामुळे सीसीटीव्ही कॅमेरे सर्व मतदान केंद्रावर लावण्यात येणार आहे. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला निवडणूक तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला ३ जानेवारीला प्रसिद्ध होणार अंतिम निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तसेच मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही आणि मूलभूत सुविधांचे सक्षमीकरण करण्याचे निर्देश

व ३ जानेवारी रोजी मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांचे दुसरे प्रशिक्षण होणार आहे.

जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी तथा आयुक्त आणि निवडणूक अधिकारी,महानगरपालिका श्रीमती आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली आज विशेष आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व पथकांच्या कामकाजाचा आढावा घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या. मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही आणि मूलभूत सुविधा शहरातील एकूण २९१ मतदान केंद्रांवर 'अ‍ॅश्युअर्ड मिनिमम फॅसिलिटी' अंतर्गत पाणी, वीज, रॅम्प आणि स्वच्छतागृहे यांसारख्या



सोयीसुविधा तातडीने पूर्ण करण्याबाबत आढावा घेण्यात आला. तसेच, सर्व मतदान केंद्रांवर सुरक्षा आणि पारदर्शकतेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या प्रक्रियेची गती वाढविण्याचे निर्देश श्रीमती मित्तल यांनी दिले. स्ट्राँग रूमची पाहणी आणि प्रशिक्षणाचे वेळापत्रक निवडणूक साहित्याच्या सुरक्षिततेसाठी तयार करण्यात आलेल्या 'स्ट्राँग रूम'ची पाहणी जिल्हाधिकारी स्वतः २ जानेवारी २०२६ रोजी करणार आहेत. निवडणूक कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांचे दुसरे महत्त्वाचे प्रशिक्षण ३ जानेवारी २०२६ रोजी सेंट मेरी हायस्कूल येथे पार पडेल. याव्यतिरिक्त, मतमोजणीबाबतचे पहिले प्रशिक्षण ७ जानेवारीला तर दुसरे प्रशिक्षण १२ जानेवारीला आयोजित करण्यात आले आहे.

कमिशनिंग आणि प्रशिक्षण मतदान यंत्रांबाबत ७ जानेवारी २०२६ रोजी विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर प्रभाग क्र. १ ते १६ पर्यंतच्या सर्व मतदान यंत्रांचे 'कमिशनिंग' ८ जानेवारी रोजी दोन स्वतंत्र सत्रांत पूर्ण केले जाणार आहे. 'स्वीप' अंतर्गत जनजागृतीचा जागर मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी 'स्वीप' उपक्रमांतर्गत व्यापक मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये: सार्वजनिक ठिकाणी बॅनर, पोस्टर्स आणि होर्डिंग्ज लावणे. घंटागाडी आणि रिक्षांद्वारे प्रभागनिहाय ध्वनिक्षेपकावरून जनजागृती. शालेय विद्यार्थ्यांमार्फत पालकांना पत्रलेखन आणि स्वाक्षरी मोहीम रांगोळी स्पर्धा, सोशल मीडिया प्रचार आणि 'मॅस्कॉट'ची (शुभंकर) नियुक्ती. रोजी निवडणूक लढविणाऱ्या वैध उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रशासनाच्या वतीने अधिकृत पत्रकार परिषद आयोजित करून निवडणूक प्रक्रियेची पुढील माहिती दिली जाईल, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. या बैठकीस सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी आणि निवडणूक विभागातील प्रमुख कर्मचारी उपस्थित होते.

## १९८७ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा धमाल मस्तीने गाजला

मंठा। प्रतिनिधी

मंठा येथील जिल्हा परिषद प्रशालेत १९८६-८७ साली शिक्षण घेत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्मृतिगंध मैत्रीचा स्नेह मेळावा धमाल मस्ती, शालेय आठवणी, अविस्मरणीय किस्से, गप्पागोष्टी आणि झिंगाट नृत्याने अविस्मरणीय ठरला. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक व या शाळेचे माजी विद्यार्थी प्रमोद सरकटे यांच्या बहारदार संगीताच्या कार्यक्रमाने खास रंगत आणली. या कार्यक्रमासाठी तत्कालीन उपशिक्षणाधिकारी एम. एफ. कुरेशी, सेवानिवृत्त शिक्षक मुकुंद खेर्डेकर, के. जी. कुलकर्णी, एस. टी. ढवळे, के. एन. कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रविवार ता. २८ डिसेंबर रोजी सर्व वर्गमित्र एकत्र जमले. ज्या जिल्हा परिषदेच्या शाळेत ३८ वर्षापूर्वी शिक्षण घेतले, त्या शाळेपासून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शाळेची घंटा वाजवून राष्ट्रगीत, शाळेच्या वतीने मंठा गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचे शिक्षण विस्तार अधिकारी के. जी. राठोड यांच्या हस्ते माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, ग्रुप फोटो यासह प्रत्येकाने जुन्या आठवणींना उजाळा दिला. माऊली मंगल कार्यालयात आयोजित कार्यक्रमात सरस्वती करण्यात येऊन मी कोण ? या सर्वांच्या पात्र परिचयानंतर विविध गुणदर्शन, गुरुजनांचा सत्कार, मार्गदर्शन आणि विविध क्षेत्रात यश मिळविलेल्या आणि वेगवेगळ्या पदावर कार्यरत असणारे वर्गमित्र प्रसिद्ध गायक प्रमोद सरकटे, उद्योजक विश्वनाथ बोराडे, गटविकास अधिकारी शिवाजी कांबळे, आंतरराज्य फळांचे व्यापारी चांद पाशा बागवान, जांब जि. परभणी येथील सरपंच सौ. मंगल बोराडे - जामकर यांची प्रगट मुलाखत प्रा. प्रदीप देशमुख यांनी घेतली. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक प्रमोद सरकटे यांच्या स्वरराज मैफिलीत " असो तुला देवा माझा सदा नमस्कार या प्रार्थनेने सुरुवात करण्यात आली. तेरे जैसा यार कहा या दोस्तीचे महत्त्व सांगणाऱ्या गाण्याला उत्स्फूर्त दाद मिळाली. माजी विद्यार्थ्यांना झिंगाटच्या तालावर नृत्य करण्यास भाग पाडले. स्नेह मेळाव्याची सांगता देशभक्तीपर गीताने करण्यात आली. प्रा. प्रदीप देशमुख यांचे खास शैलीतील सूत्रसंचालन कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. खाणेपिणे, मौजमजा, शालेय आठवणी आणि गप्पा गोष्टींनी संपूर्ण दिवस माजी विद्यार्थ्यांनी आनंदात घालवला. संपूर्ण दिवस सर्वांच्या चेहऱ्यावर उत्साहाचे वातावरण होते.

## अहिल्यानगर मनपा निवडणूक अधिकाऱ्यांकडून उमेदवारांसाठी भोजनाचे दर जाहीर

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी जय्यत तयारी सुरू झाली आहे. अर्ज भरण्याचे अवघे काही दिवस बाकी असताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांच्या खर्चासाठी खानपानचे दर जाहीर केले. त्यात शाकाहरी जेवण ११५ ते १८० रुपयांना ठरवली असून, मटण प्लेट २४० तर, बिर्याणीची प्लेट १५० रुपयांना निश्चित करण्यात आली आहे. लोकसभा विधानसभा निवडणुकीच्या पार्वभूमीवर खर्चाचे दर वाढल्याने उमेदवारांचे खर्चाचे नियोजन कोलमडणार आहे

महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे महापालिका प्रशासनाकडून सर्व तयारी करण्यात आली आहे. ३० डिसेंबर उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. त्या पार्श्वभूमीवर उमेदवारांना खर्चाची मर्यादेसह दर पत्रक निश्चित करून देण्यात आली आहे. निवडणूक कार्यालयाने उमेदवारांसाठी सुई दोऱ्यापासून ते थेट मंडप, ध्वज, बॅनर्स, प्रचार साहित्यासह खाद्य पदार्थांचे दर जाहीर केले. चहा, पाणी बॉटल, टेबल, खुर्ची, व्हेज, नॉनव्हेज जेवण, बिर्याणी, डोसा, फ्लेक्स बोर्ड, बॅरिकेटिंग, फुलांचा हार असे अनेक बाबींचे दर निश्चित करण्यात आले आहे. आता त्या दरानुसार उमेदवारांना निवडणुकीत खर्च करता येणार आहे. असे ठरले खानपानचे दर (रुपयांत) : चहा १०, कॉफी १५, पाणी बॉटल १७, पाणी जार ४०, वडापाव १५, भजे २०, पॅटिस १५, समोसा १५, कचोरी १५, भेळ २०, ढोकला ११५, राईस प्लेट ११५, स्पेशल राईस प्लेट १८०, मटन प्लेट २४०, बिर्याणी १५०, बिस्कीट १० आईस्क्रीम १०, पोहे २०, डोसा ५०, मिसळ पाव ६०, पाव भाजी ६०, शाबुदाणा खिचडी २५.

टेबल ३० ते खुर्चीसाठी १० रुपयांचा दर : उमेवारांना मंडप देण्यासाठी १५ रुपये स्वेअर फुट दराने पैसे आकारण्यात येणार आहेत. टेबल ३० ते खुर्चीसाठी १० द्यावे लागतील. नेत्यांच्या स्वागत कमानी उभारण्यासाठी आठ ते चार हजार रुपये आकारण्यात येणार आहेत.

सभांसाठी मैदानाचे दर निश्चित : महापालिकेच्या मैदानावर जाहीर सभांकरिता दर निश्चित करण्यात आले आहेत. सावेडी उपनगरातील जागिंग पार्क मैदान एका दिसाकरिता दहा हजार रुपये दर निश्चित करण्यात आला आहे. तर, गांधी मैदान विना स्टेजसाठी ३१३९ रुपये तर, स्टेजसह १५ हजार ६४६ असा दर निश्चित केला आहे. खासगी मंगल कार्यालयासाठी प्रतिदिन ५० हजार रुपये मोजावे लागणार आहेत.

## थंडीत उघड्यावर शिकणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांकडे पहा

### पालकमंत्री अजितदादांचा ताफा अडवून काळे झेंडे दाखवण्याचा इशारा

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवण केंद्रांतर्गत दत्तनगर वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांवर शिक्षणासाठी अक्षरशः उघड्यावर बसण्याची वेळ आली आहे. सुसज्ज शाळा इमारत असतानाही गेल्या दोन महिन्यांपासून शाळेकडे जाणारा रस्ता बंद झाल्याने विद्यार्थ्यांना लिंबाच्या झाडाखाली, थंडीऊन्हवारा सहन करत शिक्षण घ्यावे लागत आहे. या गंभीर प्रकाराबाबत सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांनी दि. २२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या मार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री अजितदादा पवार व आमदार विजय पंडित यांना लेखी निवेदन दिले होते. मात्र महिन्याहून अधिक कालावधी उलटूनही कोणतीही



ठोस उपाययोजना न झाल्याने प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

दत्तनगर वस्ती शाळेत इयत्ता १ ते ४ चे ३५ विद्यार्थी शिक्षण घेत असून २ ते ३ शिक्षक कार्यरत आहेत. २००७०८ मध्ये शासनाने तीन वर्गखोल्यांची इमारत बांधली आहे. मात्र परिसरातील वाढलेल्या बांधकामामुळे मागील दोन महिन्यांपासून शाळेचा रस्ता पूर्णपणे बंद झाला आहे. परिणामी विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छतागृह, निवारा अशा मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. शाळेजवळील अंगणवाडीत ६४ बालके व ५ गरोदर मातांची नोंद असून रस्ता बंद असल्यामुळे अंगणवाडीही बंद आहे. लसीकरण व पूरक आहारासाठी लाभार्थ्यांना दूर पायपीट करावी लागत असून याचा आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती पालकांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने वारंवार निवेदन देऊनही दखल न घेतल्याने अखेर दि. ३१ डिसेंबर रोजी बीड येथील सहकार संकुल भवनाच्या भूमिपूजनासाठी येणाऱ्या उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवून निदर्शने करण्याचा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी त्यांनी "गोदाकाठचा वाघ" अशी उपाधी घेतलेल्या आ. विजय पंडित यांनी त्यांच्या गेवराई मतदारसंघातील शालेय मुलांचा रस्त्याचा प्रश्न तातडीने सोडवावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

## सावित्रीबाई फुले यांनी प्रत्येक स्त्रीच्या मनात क्रांतीची मशाल पेटविली-डॉ. नागेश गवळी

बीड । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती (महिला), बीड यांच्या वतीने आयोजित "सावित्री उत्सव २०२५२६" अंतर्गत दिनांक २८/१२/२०२५ रोजी डॉ. नागेश गवळी यांचे प्रेरणादायी प्रबोधनात्मक व्याख्यान उत्साहात पार पडले. यावेळी बोलताना डॉ. नागेश गवळी यांनी सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांच्या कार्यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, देशात सामाजिक परिवर्तनाची पहिली ठोस आणि व्यापक चळवळ फुले दांपत्यांनी उभी केली. समाज शिक्षणाच्या प्रवाहात येत नाही, तोपर्यंत परिवर्तन शक्य नाही, ही भूमिका ठामपणे मांडत सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची ऐतिहासिक चळवळ सुरू केली. शिक्षणासोबतच समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांना सावित्रीबाई फुले यांनी कडाडून विरोध केला. त्या केवळ शिक्षिका नव्हत्या, तर महिला वर्गाच्या पहिल्या प्रभावी पुढारी होत्या. १८५४ साली प्रकाशित झालेल्या काव्यफुले या ग्रंथामुळे त्या देशातील पहिल्या आद्य कवयित्री



म्हणून ओळखल्या जातात. कवितेच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन आणि शिक्षणाचे महत्त्व त्यांनी प्रभावीपणे समाजासमोर मांडले, असे प्रतिपादन डॉ.गवळी यांनी केले. स्त्री म्हणून जगणाऱ्या प्रत्येकाने सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष कधीही विसरू नये. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा ध्यास त्यांनी आयुष्यभर सोडला नाही. महात्मा फुले यांच्या निधनानंतरही त्यांनी सत्यशोधक चळवळ पुढे नेत समाजजागृतीचे कार्य अखंड सुरू ठेवले. सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष आजही समाजाला प्रेरणा देणारा आहे, असे मत डॉ.गवळी यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अलका शिंदे (राऊत) होत्या. प्रमुख उपस्थितीत डॉ. योगेश क्षिरसागर, राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष तथा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस मा. सुभाष राऊत, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष तसेच सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा. कल्याण आखाडे, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष मा. किशोर राऊत, नगरसेवक मा. शुभम धुत, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष मा. नितीन साखरे आदी मान्यवर उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कौशल्या राऊत यांनी केले. प्रास्ताविक श्रीमती प्रियांका जाधव (गोरे) यांनी मांडले. मान्यवरांचे स्वागत श्रीमती साधना भोपळे, श्रीमती डॉ. वैशाली साळुंके, श्रीमती नंदा साळुंके व श्रीमती पूजा लांडगे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची प्रेरणा समाजात अधिक दृढ करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणीय होती तसेच परिसरातील फुलेशाहूआंबेडकर विचारधारेवर प्रेम करणारे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१६८०
दिनांक - २३/१२/२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती विठ्ठल पांडुरंग वाघमारे रा. डोमलगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अर्थव विठ्ठल वाघमारे | मुलगा | १९/०६/२०११ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

## जालन्यात महायुती तुटली तर आघाडीचा जमलं व अजित पवार गट स्वबळावर लढणार

जालना । प्रतिनिधी

**जालना महानगरपालिका निवडणूक मध्ये महायुतीमध्ये बिघाड झाल्यामुळे मनसेराष्ट्रवादी युती करून (अजित पवार गट) स्वबळावर निवडणूक लढणार आहे यामुळे भाजप गटाला व शिंदे गटाला मोठी नुकसान होण्याची शक्यता आहे. या निवडणुकीमध्ये अजित पवार गटाकडून ५० उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहे तसेच मनसेचे वतीने ६ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहे अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी दिली आहे यावेळी या पत्रकार परिषद मध्ये**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण, राज्य उपाध्यक्ष मधुकर अर्दड, जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांतजी कारके, शहराध्यक्ष शेख महेमुदभाई, तेलगड, अन्वर मिर्जा, अमोल खरात, संतोष डेंगळे यांच्यासह मनसेचे पदाधिकारी पत्रकार परिषद मध्ये उपस्थित होते. या पत्रकार परिषद मध्ये बोलताना माजी आमदार चव्हाण म्हणाले की भाजपकडून आम्हाला चकवा देण्यात आला परंतु आम्ही मनसेला सोबत घेऊन राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून ३० जगाचे उमेदवार अर्ज दाखल केले तर मनसेला सहा जागा देण्यात आले.या उमेदवाराच्या प्रचारासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा घेणार असल्याचे ते म्हणाले तशी मागणी आम्ही अजित पवार यांच्याकडे करणार आहे तसेच राष्ट्रवादीचे नेते प्रचार स्टार धनंजय भाऊ मुंडे यांनाही सभेसाठी निमंत्रण करण्यात येणार आहे. जालना शहरातील विकासाच्या मुद्द्यावर आम्ही निवडणूक लढणार आहे अशी माहिती पत्रकार परिषद मध्ये देण्यात आली. महाविकास आघाडी पक्षाकडून काँग्रेस ४० जाग्यावर उमेदवारी अर्ज दाखल केले आहे तर शरद पवार गटाला १३ जागा देण्यात आला आहे त्यांच्या वतीने त्यांचे १३ उमेदवार अर्ज दाखल केला आहे. उद्धव ठाकरे गटाला १२ जागा देण्यात आले आहे तसेच त्यांनीही त्यांच्या १२ जाग्यावरील



उमेदवारी अर्ज दाखल केले आहे शरद पवार गट काँग्रेस गट उद्धव ठाकरे गट असे तिने मिळून महाविकास आघाडी निवडणूक लढवीत आहे. तसेच भाजप स्वबळावर निवडणूक लढून ६४ जागेवरील ६४ उमेदवाराच्या अर्ज दाखल केले आहे.जालना महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराच्या राजकारणात महत्त्वाची उलथापालथ झाली असून महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) यांनी निवडणूक एकत्रितपणे लढवण्याचा निर्णय घेतला आहे. या युतीची अधिकृत घोषणा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष आणि मनसेचे जिल्हाध्यक्ष यांनी संयुक्तरित्या केली. या घोषणेमुळे जालना शहरातील राजकीय वातावरण तापले असून, आतापर्यंत स्पष्ट असलेली समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मनपा निवडणुकीत स्वबळावर लढण्याच्या चर्चांना पूर्णविराम देत दोन्ही पक्षांनी आघाडीचा मार्ग स्वीकारला आहे. दोन्ही पक्षांचा हा निर्णय स्थानिक पातळीवरील वाढती नाराजी, नागरी समस्यांचा ढीग आणि विद्यमान कारभाराविरोधातील असंतोषातून घेतल्याचे नेत्यांनी स्पष्ट केले. संयुक्त पत्रकार परिषदेत बोलताना जिल्हाध्यक्षांनी सांगितले की, जालना शहरात पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, ड्रेनेज, स्वच्छता, अतिक्रमण आणि प्रशासनातील अनियमितता या प्रश्नांनी नागरिक त्रस्त आहेत. या पार्श्वभूमीवर केवळ सत्तेसाठी नव्हे, तर शहराच्या विकासासाठी आणि सक्षम प्रशासनासाठी ही युती करण्यात आली आहे, असा ठाम दावा त्यांनी केला. या युतीअंतर्गत प्रभागनिहाय जागावाटप समन्वयाने केले जाणार असून, स्थानिक पातळीवर स्वीकारार्ह व कार्यक्षम उमेदवार दिले जातील, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. प्रचारात संयुक्त सभा, पदयात्रा आणि घराघरात जाऊन संवाद साधण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच तरुण, महिला आणि व्यापारी वर्गाला केंद्रस्थानी ठेवून स्वतंत्र प्रचार रणनीती आखली जात असल्याचे संकेत देण्यात आले. मनसेराष्ट्रवादी (अजित पवार गट) युतीमुळे महायुती तसेच काँग्रेस आघाडीसमोर थेट आणि संघटित आव्हान उभे राहण्याची शक्यता असून, मनपा निवडणूक अधिक चुरशीची होणार असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. आगामी काळात उमेदवार यादी आणि प्रचार कार्यक्रम जाहीर होताच जालना शहरातील राजकीय हालचालींना अधिक वेग येणार आहे.

## तृतीयपंथीयाला मारहाण ; कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

अहिल्यानगर। प्रतिनिधी

येथील केडगाव परिसरात एका तृतीयपंथीयाला जुन्या प्रेमसंबंधातून आणि पैशांच्या वादातून बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. लोंढेमळा भागात गुरुवारी (२५ डिसेंबर) रात्री ही घटना घडली असून, संशयित आरोपींनी सोन्याचे दागिने आणि मोबाईल हिसकावून घेतल्याची फिर्याद पीडित व्यक्तीने कोतवाली पोलीस ठाण्यात दिली आहे.

फिर्यादी हे केडगाव देवी मंदिराजवळ राहतात. त्यांचे संशयित आरोपी ऋषीकेश गवळी याच्याशी मागील दहा वर्षांपासून संबंध होते. मात्र, आरोपीने लग्नाची माहिती लपवून फसवणूक केल्याने पीडिताने त्याच्याशी संबंध तोडले होते. गेल्या काही महिन्यांपासून आरोपी पुन्हा जवळीक साधण्याचा प्रयत्न करत होता, तसेच व्यवसायासाठी घेतलेले पैसे आणि सोन्याचे दागिने परत देण्यास टाळाटाळ करत होता. गुरूवारी रात्री साडेअकराच्या सुमारास फिर्यादी आपल्या शिष्यांसह लोंढेमळा येथे पैसे मागण्यासाठी गेले होते.त्यावेळी आरोपी ऋषीकेश त्याचे आई-वडील आणि इतर दोन अनोळखी व्यक्तींनी संगनमत करून फिर्यादीला शिवीगाळ केली. लाकडी दांडक्याने मारहाण केली. मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या सहकाऱ्यांनाही आरोपींनी मारहाण केली. मारहाणीदरम्यान आरोपीने फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला. कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून तपास पोलीस करीत आहेत.

# नगरपालिकेत पंडित-क्षीरसागर येणार एकत्र

## दोन्ही क्षीरसागर एकत्र नाही महायुतीचा फार्मूला बीडमध्ये

बीड । प्रतिनिधी







नगरपालिकेच्या निवडणुका झाल्यानंतर भाजपाच्या गटनेत्या सारिका क्षीरसागर यांना पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नानंतर त्यांनी दिलेल्या उत्तरावर विरोधकांनी दोन्ही क्षीरसागर एकच असल्याचे बोलले होते परंतु तसे काहीही नाही राज्यात माहितीचे सरकार असल्याने नगरपालिकेमध्ये उपाध्यक्ष आणि स्थायी समितीच्या सभापती पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप एकत्र येणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

राजकारणामध्ये आमदार संदीप क्षीरसागर आणि चुलत बंधू डॉक्टर योगेश क्षीरसागर एकमेकांना पाण्यात पाहत आहेत अशातच झालेल्या नगरपालिका निवडणुकांमध्ये संदीप क्षीरसागर योगेश क्षीरसागर या दोघाही भावांना पराभवाचा सामना करावा लागला आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले पक्षीय बलाबल पाहता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा नगराध्यक्ष असला तरी उपसभापती आणि स्थायी समितीचे अध्यक्ष निवडीसाठी पुरेसे पाठबळ नाही त्यासाठी अन्य कोणाची तरी मदत घ्यावी लागेल त्यावरच बीड शहरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि भाजपाचे योगेश क्षीरसागर यांची युती होणार असल्याचे बोलले जात होते विरोधकाकडून दोन्ही क्षीरसागर एकत्रच असल्याचे देखील बोलले गेले मात्र परिस्थिती यापेक्षा वेगळी आहे राज्यात महायुतीची सत्ता असल्याने भाजप दोन क्रमांकाचा पक्ष राहिला असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप दोघेही एकत्र येणार असल्याचे दिसत आहे त्यामुळे आमदार संदीप क्षीरसागर यांना पंडित आणि योगेश क्षीरसागर पुन्हा नगरपालिकेतील सत्तेपासून दूर ठेवणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे विशेष म्हणजे डॉक्टर योगेश क्षीरसागर हे अमरसिंह पंडित विजयसिंह पंडित यांच्याकडे बीड नगरपालिकेची सूत्र दिल्यामुळे नाराज होऊन भाजपमध्ये गेले होते परंतु आता पुन्हा वरिष्ठांच्या निर्णयानंतर स्थायी समिती आणि उपाध्यक्ष पदासाठी एकत्र येत आहेत त्यामुळे उद्या पुन्हा एकदा डॉक्टर योगेश क्षीरसागर आमदार विजयसिंह पंडित हे बीड नगरपालिकेच्या सभागृहामध्ये एकत्र दिसतील यावरून आश्चर्य वाटायला नको.

### दोन्ही क्षीरसागर राजकारणात वेगळे

नगरपालिका निवडणुकीनंतर दोन्ही क्षीरसागर बंधूंना पराभवाचा सामना करावा लागला मात्र त्यांची सदस्य संख्याही विजयी पक्षाच्या सदस्य संख्येपेक्षा मोठी असल्याने उपाध्यक्ष आणि स्थायी समितीमध्ये दोन्ही क्षीरसागर एकत्र होतील असे बोलले जात होते मात्र राज्य पातळीवरील निर्णयानंतर दोन्ही क्षीरसागर एकत्र नव्हे तर वेगळेच राहणार हे दिसून येत आहे जे वेगळे लढले ते पंडित आणि क्षीरसागर एकत्र येतील अशी चित्र दिसत आहेत.

### नगराध्यक्ष निवडीवर नाराजीची चर्चा

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या नगराध्यक्ष प्रेमलता पारवे या मोठ्या मताने निवडून आल्या मात्र बीड शहरांमध्ये अनेकांना ही निवड पटलेली नाही असे दिसत आहे अनेक ठिकाणची चर्चा पाहता सक्षम उमेदवार हवा होता उमेदवार एक आणि कारभार अनेक अशी चर्चा होत आहे किमान तुतारी ती नसेल तर कमळ हसा उमेदवार हवा होता अशी चर्चा आता करताना नागरिक ठीक ठिकाणी दिसत आहेत

# बीड नगर पालिकेच्या गटनेते पदी फारुक पटेल

## अजितदादांच्या नेतृत्वात शब्द पूर्ण करणारे प्रतिनिधी देऊ -आ. विजयसिंह पंडित

बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेत ऐतिहासिक विजय मिळविल्यानंतर राष्ट्रवादी पक्षाच्या नेतृत्वात शिव-शाहू-फुले आघाडीची स्थापना झाली असून राष्ट्रवादी सह बीड शहरातील समविचारी विजयी नगरसेवकांची ऐकी झाली असून नगर परिषदेत आघाडीकडून गटनेते म्हणून ज्येष्ठ नगरसेवक फारुक पटेल यांची निवड करण्यात आली. प्रचाराच्या दरम्यान मतदारांना आम्ही पक्ष म्हणून विजयानंतर विकासाचे शब्द दिले, नागरी समस्यांचे निराकरण करू असा शब्द आम्ही प्रभागनिहाय बैठका, सभांतून दिला होता. आज



बीडकरांनी अजितदादांवर विश्वास ठेऊन पुरोगामी मतांची वज्रमुठ सिध्द केली आहे. दिलेले शब्द आणि आश्वासने पाळणारी आणि सामाजिक अभिसरण आणि विकासाचे समीकरण साधणारे प्रतिनिधी मंडळ आम्ही लोकांच्या सेवेत देणार आहोत असे आ. विजयसिंह पंडित यांनी सांगितले असून यावेळी त्यांनी फारुक पटेल यांचा सत्कार केला व उपस्थित विजयी नगरसेवक व पक्ष पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.

बीड नगर पालिकेच्या निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आकडे जुळवताना आज आघाडी स्थापन करून गटनेता निवडला. ज्येष्ठ नगरसेवक राहिलेले फारुक पटेल यांची निवड करण्यात आली. सदरील निवड प्रक्रिया ही आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वात तथा पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, निवडणुक निरीक्षक मा. आ. संजय दौंड तथा पक्षाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शिवछत्र येथे पार पडली. सकाळी ११ वाजता सर्व नगरसेवकांच्या भावना, सूचना आ. विजयसिंह पंडित यांनी लक्षात घेऊन पक्षाकडे या संदर्भाने ◀◀ पान ३ वर

# गेवराईच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीला सर्वांना सोबत घेवून चालना देणार -नगराध्यक्ष गीताभाभी पवार

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गेवराई हा सांस्कृतिक चळवळ जोपासणारा तालुका आहे. सामाजिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रातील प्रगती हे शहराचे संस्कार दाखवत असतात. त्यामुळे येणाऱ्या काळात शहराच्या विकासासह येथील सांस्कृतिक चळवळीला चालना देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील असा विश्वास नूतन नगराध्यक्ष सौ गीताभाभी बाळराजे पवार यांनी व्यक्त केला आहे.

बीड जिल्ह्यातील गेवराई नगरीच्या प्रथम नागरिक, नवनिर्वाचित नगराध्यक्ष सौ गीताभाभी बाळराजे पवार यांची नगराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कलाविष्कार प्रतिष्ठानच्या वतीने कार्यवाहक दिनकर शिंदे आणि सचिव



सौ आशाताई शिंदे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृदयसत्कार केला. यावेळी नगराध्यक्ष सौ गीता भाभी पवार यांनी शहराचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी कलाविष्कार प्रतिष्ठानने केलेल्या कार्याचे कौतुक केले.

शहरात रस्ते, नाल्या, लाईट, पाणी या विकासात्मक कामासोबतच येथील कला, क्रीडा, आरोग्य आणि सांस्कृतिक चळवळही महत्वाची असते. आज पर्यंत गेवराई शहरात अनेक संस्था आणि खेळाडू कलावंतांनी ही भूमिका यशस्वीपणे पार पाडली. यातच कलाविष्कार प्रतिष्ठानने सातत्याने विविध समाज उपयोगी उपक्रम राबवून येथील भूमिपुत्रांना नेहमीच संधी दिली ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. यापुढेही या सांस्कृतिक चळवळीला अधिक गतीने चालना देण्यासाठी माझे प्रयत्न राहतील. गेवराई शहराचा विकास आणि सामाजिक एकोपा राखण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे नगराध्यक्ष ◀◀ पान ३ वर

# वैद्यकिन्ही टोलनाक्याजवळ टोळक्याकडून कुटुंबावर हल्ला

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही टोल नाक्याजवळ एका महिलेसह तीन जणांना जमावाकडून वेदम मारहाण करण्यात आली आहे. घटना सोमवारी रात्री उशिरा घडली. या प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली.



या अमानुषपणे मारहाणीचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत असून त्यामध्ये काहीजण गंभीररित्या जखमी झाल्याचे दिसून येत आहे. रात्री साडेनऊ ची घटना घडल्यानंतर जवळपास साडेदहापर्यंत पोलीस ही पोचले नव्हते.दरम्यान, परिसरातील नागरिकांनी जखमींना जिल्हा रुग्णालय बीड येथे उपचारासाठी दाखल केले आहे. जखमीच्या अंगावर मारहाणीचे गंभीर होऊन असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती वैद्यकीय सूत्राकडून देण्यात आली आहे. विशेष म्हणजे या घटनेत एका महिलेचाही समावेश असल्याने नागरिकांमध्ये तीव्र समता व्यक्त केला जात आहे. दरम्यान, ही मारहाण नेमकी कोणत्या कारणावरून करण्यात आली याबाबत अद्याप स्पष्ट माहिती नाही. मात्र, व्हायरल व्हिडिओ मुळे या घटनेची गंभीरता अधोरेखित झाली आहे. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत असल्याचे सांगण्यात आले आहे.

# शेतात जात असताना रस्त्यात करंट; शेतकऱ्याचा जागीच मृत्यू

पाटोदा । प्रतिनिधी

शेतात गवत आणण्यासाठी जात असताना रस्त्यात पडलेल्या वीज तारेला स्पर्श झाल्याने करंट बसून सौताडा गावातील शेतकरी मच्छिंद्र उबाळे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. २९ डिसेंबर २०२५) दुपार दरम्यान घडली



मच्छिंद्र उबाळे हे दुपारच्या सुमारास आपल्या शेतात गवत आणण्यासाठी गेले होते. शेतात जाणाऱ्या रस्त्यावर वीज तार होती. त्या तारेच्या संपर्कात आल्याने त्यांना जोरदार करंट बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना दुपारी तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान घडली असावी, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

◀◀ पान ३ वर

# उपनगराध्यक्षपदी शिवसेनेच्या संजय उडाण यांची नियुक्ती करा -अनभुले, सुरवसे

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या बीड नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसंग्राम युतीला मतदारांनी भरघोस कौल दिला आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रेमलताताई पारवे यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला असून, युतीचे तब्बल २२ नगरसेवकही विजयी झाले आहेत.





या पार्श्वभूमीवर सलग दोन टर्मपासून नगरसेवक म्हणून कार्यरत असलेले शिवसेनेचे ज्येष्ठ नगरसेवक संजय उडाण यांची उपनगराध्यक्ष पदी निवड करावी, अशी जोरदार मागणी शहरभरातून होत आहे. नगरपालिकेतील दीर्घ अनुभव, जनतेशी असलेला थेट संपर्क आणि पक्षसंघटनातील योगदान लक्षात घेता संजय उडाण हे उपनगराध्यक्ष पदासाठी योग्य उमेदवार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

दरम्यान, बीड नगरपालिका निवडणुकीतील विजयामध्ये यथायोग्य योगदान देणाऱ्या मित्र पक्ष शिवसेनेला न्याय मिळावा, या उद्देशाने राष्ट्रवादी काँग्रेसने शिवसेनेचे नगरसेवक संजय उडाण यांची उपनगराध्यक्ष पदी निवड करावी, अशी अधिकृत मागणी शिवसेना बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले आणि शिवसेना बीड जिल्हा संघटक सुनिल सुरवसे यांनी केली आहे. युतीतील घटक पक्षांमध्ये समन्वय राखून योग्य निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत असून उपनगराध्यक्ष पदाबाबत लवकरच सकारात्मक निर्णय होईल, असा विश्वास शिवसेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# शुक्ल तिर्थ लिमगाव येथील श्री महाविष्णू मंदिर संरक्षित स्मारक म्हणून शासनाकडून घोषित

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील शुक्ल तिर्थ लिमगाव येथील श्री महाविष्णू मंदिराला राज्य संरक्षित स्मारक घोषीत करावे म्हणून आ.प्रकाश सोळंके यांनी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता, त्यासाठी आ.सोंळके यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याने राज्य शासनाने शुक्ल तिर्थ लिमगाव येथील श्री महाविष्णू मंदिराला राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्याची अधिसूचना दि २९ डिसेंबर सोमवार रोजी शासन निर्णयानुसार काढली



**आ.प्रकाश सोळंकेंच्या पाठपुराव्याला यश**

आहे.त्यामुळे शुक्ल तिर्थ लिमगाव येथील सरपंच कृष्णा थावरे यांच्यासह ग्रामस्थांनी आ.सोळंके यांचा सत्कार करुन आभार मानले आहेत.

माजलगाव तालुक्यातील शुक्ल तिर्थ लिमगाव येथील श्री. महाविष्णू मंदिर गावठाण मालमत्ता क्र. २६५ (विष्णू मंदिर) महाविष्णू मंदिर हे इ.स. १२ व्या शतकातील कल्याणी चालुक्यकालीन मंदिर आहे.या मंदिराची रचना मुखमंडप, सभामंडप, ◀◀ पान ३ वर

# खोटी व बनावट नावे लावून मतदान करणाऱ्या व त्यांना प्रोत्साहन देणाऱ्यांची सखोल चौकशी करा

**माजलगाव । प्रतिनिधी**

जुना प्रभाग क्र.१२ (नवीन प्रभाग क्र.१३) आझाद नगर, माजलगाव सन २०१६-२०१७ साली जे नगर परिषद माजलगाव यांचे मतदान झाले त्यावेळी बी.एल.ओ (शिक्षक) यांनी जे नवीन मतदार लोकांची नावे लावण्याबाबतचे अर्ज तहसिलदार माजलगाव यांच्याकडे सादर केले त्या अर्जाच्या मुळ संचिका संहितची यादी देन्यात यावी व खोटी व बनावट आधार कार्ड तयार करून बाहेरील गावाच्या लोकांनी बोगस मतदार केले याची व त्यांना प्रोत्साहन




देणाऱ्या अधिकारी व नेत्यांची सखोल चौकशी करा या मागणी साठी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी दि ३० डिसेंबर मंगळवार पासून येथील उपविभागीय कार्यालयात समोर आमरण उपोषण सुरू केले आहे

शहरातील जुना प्रभाग क्र.१२ (नवीन प्रभाग क्र.१३) आझाद नगर, माजलगाव येथे तत्कालीन सन २०१६-२०१७ या वर्षी जी नगर परिषद माजलगाव यांची निवडणुक घेण्यात आली. त्यावेळी बी.एल.ओ (शिक्षक) यांनी नवीन नावाची नोंद घेवुन त्याची यादी तहसिलदार, माजलगाव यांच्याकडे देण्यात आली. त्यांनी लोकांची नावे नवीन समाविष्ट केली त्या लोकांच्या नावाची संचिका निवेदकास न्यायालयीन कामासाठी हवी आहे ती देण्यात यावी. कारण त्या यादीमध्ये ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रवादीच्या गटनेतेपदी नितीन शिनगारे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

किल्ले धारूर नगरपरिषदेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आपला झेंडा फडकल्यानंतर गटनेते पदाची निवड दि.३० डिसेंबर रोजी आ. प्रकाश सोळंक व विधानसभा अध्यक्ष जयदत्त नरवडे यांच्या सह नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत एक मताने राष्ट्रवदी काँग्रेस पार्टीचे एकनिष्ठ माजी शहराध्यक्ष व नवनिर्वाचित नगरसेवक नितीन शिनगारे यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली. नितीन शिनगारे यांच्या निवडीनंतर सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



किल्ले धारूर नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया पार पडली असून निकाल देखील जाहीर झालेला आहे यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने (अजित पवार गट) किल्ले धारूर नगरपरिषदेवर आपली सत्ता मिळवली आहे सत्ता मिळवल्यानंतर गटनेते पद निवड प्रक्रिया पार पडण्यासाठी राष्ट्रवादी पक्षाचे माजलगाव विधानसभा अध्यक्ष जयदत्त नरवडे यांच्या अध्यक्षतेखाली माजलगाव येथे बैठक संपन्न होऊन आ. प्रकाश सोळंके यांच्या शिफारशीने व नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक यांच्या सहमतीने झालेल्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष तथा नवनिर्वाचित नगरसेवक नितीन शिनगारे यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली असून तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे. गटनेतेपदी नितीन शिनगारे यांची निवड होतात एकनिष्ठतेला न्याय मिळाला अशा भावना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात आल्या तसेच सर्व स्तरातून नितीन शिनगारे यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# शाहीरी जलशातून सामाजिक क्रांतीचा जागर

## गंगाई बाबाजी महोत्सवात महाजलसा उत्साहात

**आष्टी । प्रतिनिधी**

**गंगाई बाबाजी महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या महाजलसा या लोककला शाहीरी कार्यक्रमाने उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. शहीर शितल साठे, शाहीर सचिन माळी व त्यांच्या सहकलावंतांनी सादर केलेल्या शाहीरी जलशातून लोककलेच्या माध्यमातून सामाजिक इतिहासाचा जागर घालण्यात आला.**

या महाजलशामध्ये छत्रपती शिवरायांचे मावळे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनकार्याचा आणि सामाजिक लढ्याचा सखोल व प्रभावी आढावा सादर करण्यात आला. पोवाडा, शाहिरी गीतं, सवाल-जवाब आणि प्रबोधनपर संवादाच्या माध्यमातून अन्यायाविरुद्धचा लढा, समतेची चळवळ आणि सामाजिक परिवर्तनाचा इतिहास उलगडण्यात आला.

शहीर शितल साठे यांच्या सशक्त आवाजात सादर झालेल्या शाहिरी रचना आणि शाहीर सचिन माळी यांच्या ओघवत्या निवेदनाने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. सहकलावंतांनी ढोलकी, तुणतुणे व पारंपरिक वाद्यांच्या तालावर सादर केलेल्या गीतांनी संपूर्ण परिसर भारावून टाकला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांच्या शौर्यगाथा सादर करताना स्वराज्य, न्याय व लोककल्याणाचा संदेश देण्यात आला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या विचारधारेतून सामाजिक समता, शिक्षण आणि मानवमुक्तीचा मार्ग अधोरेखित करण्यात आला. कार्यक्रमाला विविध सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर, युवक-युवती, शेतकरी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांचे कौतुक केले.

गंगाई बाबाजी महोत्सवाच्या माध्यमातून लोककला, इतिहास आणि समाजप्रबोधन ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी अभिरक्षा व निवडणूक साहित्य कक्षाची केली पाहणी

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर मतदान प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व अडथळाविरहीत पार पडावी, यासाठी महापालिका प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी अभिरक्षा कक्ष (तसेच निवडणूक साहित्य कक्षाची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान ईव्हीएम मशिन्सची साठवणूक, सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था तसेच वापरापूर्वी व वापरानंतरच्या प्रक्रियांची माहिती घेण्यात आली. मतदान केंद्रांपर्यंत ईव्हीएम मशिन्स व संबंधित साहित्य पोहोचवताना तसेच मतदानानंतर ती सुरक्षितरीत्या परत आणताना कोणतीही चूक किंवा निष्काळजीपणा होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्त हर्डीकर यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना यावेळी दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, नगर सचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, कार्यकारी अभियंता सुनील पवार, अभिमान भोसले, संजय काशिद, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक विभागातील वरिष्ठ अधिकारी, संबंधित शाखांचे प्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मतदानासाठी वापरण्यात येणारी ईव्हीएम यंत्रे व निवडणूक साहित्य महाराष्ट्र राज्य निवडणूक






आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बीड व कोल्हापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून पिंपरी येथे सुरक्षितरीत्या आणण्यात आली आहेत. पिंपरी येथे दाखल झाल्यानंतर सर्व वाहनांच्या सीलबंद स्थितीची खातरजमा करून राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ईव्हीएम यंत्रे अभिरक्षा कक्षामध्ये सुरक्षितरीत्या ठेवण्यात आली आहेत. या अभिरक्षा कक्षाची पाहणी करताना आयुक्त हर्डीकर यांनी ईव्हीएम मशिन्स हाताळताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करणे, मशिन्सच्या सीलिंग, तपासणी व चाचणी प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखणे, तसेच कोणतीही तांत्रिक अडचण उद्भवल्यास तत्काळ उपाययोजना करण्यासाठी सज्ज राहण्याचे निर्देश दिले. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचारी यांच्यात योग्य समन्वय असणे अत्यंत आवश्यक असून प्रत्येकाने आपली जबाबदारी गंभीरतेने व नियमानुसार पार पाडावी, असेही त्यांनी नमूद केले. तसेच निवडणूक साहित्याची योग्य नोंद, साठवणूक व वितरण प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, याबाबतही खबरदारी घेण्याच्या सूचना देखील आयुक्त हर्डीकर यांनी दिल्या.

याशिवाय, निवडणूक प्रक्रियेत सहभागी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी नियमांचे पालन करून काम केल्यासच लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होईल. तसेच महापालिका प्रशासनाच्या या तयारीमुळे पिंपरी चिंचवड शहरातील सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ शांततेत, सुरक्षित व यशस्वीरीत्या पार पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# अष्टापूर येथे बिबट्या जेरबंद



वाघोली । प्रतिनिधी

अष्टापूर तालुका हवेली येथील खोल शेत वस्ती येथे वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यामध्ये बिबट्या जेरबंद झाला आहे. गेल्या वर्षभरापासून अष्टापुर गावांमध्ये बिबट्याची दहशत निर्माण झाली होती. याच महिन्यामध्ये खोल शेतीतील महिलेवर बिबट्याने हल्ला केला होता.

त्या हल्ल्यामध्ये ती महिला गंभीर जखमी झाली होती. दोन दिवसांपूर्वी अष्टापूर येथील पठार वस्ती येथे उसाच्या शेतामध्ये बिबट्यांची लहान पिल्ले आढळून आली होती. त्यामध्ये एक पिल्लू वनविभागाने रेस्क्यू केले होते.

अष्टापुर ग्रामपंचायतच्या विद्यमान सरपंच पुष्पा सुरेश कोतवाल व सर्व सदस्यांच्या मागणीनुसार वन विभागाकडे व शिरूर हवेलीचे आमदार माऊली आबा कटके यांच्याकडे त्या महिलेस नुकसान भरपाई या मागणीचे पत्र दिले होते. या मागणीचा विचार करून आमदार माऊली आबा कटके यांनी या महिलेला नुकसान भरपाई म्हणून शासनातर्फे पाच लाखाचा धनादेश मिळवून दिला होता.

# अजित पवारांकडून पुण्यात गुंडांच्या टोळ्यात तिकिट वाटप

## मुंबईतही एकनाथ शिंदेपेक्षा वरचढ ठरले!

**पुणे । प्रतिनिधी**

**गुन्हेगारांना सोडणार नाही, टायरमध्ये घाला, अमुक ठिकाणी घाला, तमुक ठिकाणी घाला अशा जाहीर वल्गना करणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यामध्ये मात्र महापालिका निवडणुकीमध्ये आपली सर्व तत्त्व बाजूला ठेवून चक्क गुंडांच्या टोळ्यांमध्ये तिकीट वाटप केलं आहे. आयुष कोमकर हत्या प्रकरणामध्ये जेलमध्ये असलेल्या सोनाली आणि लक्ष्मी आंदेकर यांना महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग २३ मधून उमेदवारी दिली आहे. त्यामुळे आता या दोघीसुद्धा जेलमधून निवडणूक लढवणार आहेत. दुसरीकडे गजा मारणेच्या बायकोला सुद्धा अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे या दोन्ही घराण्यांचा गुन्हेगारी पार्श्वभूमीचा इतिहास असतानाही अजित पवारांनी सढळ हाताने उमेदवारी दिल्याने पुण्यातील गुन्हेगारीमुक्तीची स्वप्ने पाहणाऱ्या 'पालकमंत्री' अजित पवारांना आता या उमेदवारी कशा चालतात? असा सुद्धा प्रश्न उपस्थित झाला आहे.**

दुसरीकडे पुण्यामध्ये अजित पवारांनी गुन्हेगारांमध्ये हात सैल सोडला असतानाच मुंबईमध्ये सुद्धा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापेक्षा अधिक उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. मुंबई मनपासाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून जवळपास ९६ उमेदवार उतरवण्यात आले आहेत. शिंदे सेनेकडून ९० उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसकडून ११ उत्तर भारतीय, मराठी ५६, मुस्लिम २३, ख्रिश्चन तीन, तेलगू एक, तमिळ एक आणि बोहरा मुस्लिम एक समीकरण आहे. पक्षाकडून ५० महिला उमेदवारांना तर ४६ पुरुष उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. एससी प्रवर्गातून १२ उमेदवार आहेत, तर ओबीसी मधून १७ उमेदवार आहेत. दुसरीकडे शिवसेना ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीचा सुद्धा फॉर्म्युला समोर आला आहे. मुंबईमध्ये शिवसेना ठाकरे १६३ जागांवर रिंगणामध्ये आहे. मनसेला ५३ जागा देण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरचंद्र पक्षाला ११ जागा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे मुंबईमध्ये ठाकरे शिवसेनेचे उमेदवार सर्वाधिक असल्याचे चित्र आहे.

# शिक्रापूरमध्ये घरफोडीचा थरार! महिलेच्या घरातून सव्वा तीन तोळे सोन्याचे दागिने चोरी



शिक्रापूर - करंजेनगर भागात राहणाऱ्या एका महिलेच्या घरातून सव्वा तीन तोळे वजनाचे दागिने चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. घराला कडी लावून काही वेळ खाली गेलेल्या सुप्रिया शंकर शिवले (वय ३५) यांच्या घरातून अज्ञात चोरट्याने सोफ्यामध्ये ठेवलेले दागिने लंपास केले आहेत. या प्रकरणी शिक्रापूर पोलिसात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुप्रिया शिवले घटनेच्या वेळी खालच्या मजल्यावर राहणाऱ्या त्यांच्या मैत्रिणीकडे गेल्या होत्या. काही वेळाने सुप्रिया पुन्हा घरी आल्या आणि सोफ्यामध्ये ठेवलेले दागिने घालण्यासाठी शोधू लागल्या. मात्र, तिथे ठेवलेले सव्वा तीन तोळे वजनाचे सोन्याचे गंठण आणि कानातील टॉप्स गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत सुप्रिया शिवले यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिक्रापूर पोलिसांनी अज्ञातावर गुन्हा नोंदवला आहे. भरवस्तीत झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस हवालदार विश्वांबर वाघमारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# आळंदीमध्ये भर दुपारी बुलेट चोरी! सीसीटीव्हीत कैद झाली घटना, पोलिसांच्या तपासावर संताप

आळंदी । प्रतिनिधी

मरकळ रस्त्यावरील कोकणस्थ धर्मशाळेसमोरून दि. २७ रोजी भर दुपारी बुलेट चोरीला गेल्याची घटना घडली आहे. एम.एच. १४ एल.जी. ७९५६ या क्रमांकाची ही बुलेट मालक अभिषेक राजेंद्र अंबिरकर यांनी धर्मशाळेबाहेर उभी केली होती.याबाबत अभिषेक अंबिरकर यांनी आळंदी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.



विशेष म्हणजे, चोरीची ही संपूर्ण घटना जवळच असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. अंबिरकर यांनी या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना उपलब्ध करून दिले आहे, मात्र पोलिसांकडून केवळ तपास सुरू असल्याचे मोघम उत्तर मिळत असल्याची तक्रार त्यांनी केली आहे.घटनेला चार दिवस उलटूनही चोरीला गेलेल्या बुलेटचा अद्याप कोणताही थांगपत्ता लागलेला नाही.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये पुरावा उपलब्ध असूनही पोलीस प्रशासनाकडून तपासात दिरंगाई होत असल्याचा आरोप वाहन मालकाने केला आहे. तीर्थक्षेत्र आळंदी परिसरात सातत्याने होणाऱ्या वाहन चोरीच्या घटनांमुळे नागरिकांनी पोलीस गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास आळंदी पोलीस करत आहेत.

# ३२ वर्षांनी माजी विद्यार्थी आले एकत्र! जुन्या आठवणींना मिळाला उजाळा; गुरुजींच्या डोळ्यांत आनंदाश्रू

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील हिवरे कुंभार येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या १९९५ सालच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा तब्बल ३२ वर्षांनंतर ऐतिहासिक शिवनेरी गडावर अत्यंत भावनिक आणि उत्साही वातावरणात पार पडला. बालपणी एकाच वर्गात शिकलेले विद्यार्थी पुन्हा एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, तर त्या आठवणी घडविणाऱ्या गुरुजनांचा सत्कार हा या कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. या वेळी त्या काळात विद्यार्थ्यांना घडविणारे चिमाजी बालचिंग गुरुजी यांचा विद्यार्थ्यांच्या वतीने अनोख्या पद्धतीने सत्कार करण्यात आला. शिवनेरी गडावर जाऊन गुरुजींना



विशेष भेटवस्तू देण्यात आली. हा प्रसंग पाहून गुरुजी भावूक झाले आणि त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू अनावर झाले.

सत्काराला उत्तर देताना गुरुजी म्हणाले, आज आपण सर्वजण ३२ वर्षांनंतर भेटलो, याचा खूप आनंद झाला. तुमचं बालपण, शाळेतील प्रसंग एकेक करून आठवत आहेत. तुमची आजची प्रगती, आत्मविश्वास आणि निर्भीड जीवनशैली पाहून मला मनापासून समाधान वाटतं. तुम्ही केलेला हा सन्मान माझ्या आयुष्यातील अत्यंत मोलाची गोष्ट आहे. ते पुढे म्हणाले की, माझ्याकडून तुम्हा सर्वांचं आदरातिथ्य करण्याचं नियोजन होतं; मात्र एन.एम.एस. परीक्षेमुळे शिक्षक मित्र पर्यवेक्षक म्हणून गेले आणि नियोजन विस्कळीत झालं. भविष्यात पुन्हा योग आला तर ही उणीव भरून काढण्याचा नक्की प्रयत्न करीन. गुरुजींनी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा देताना म्हटले, तुमच्या परिवारातील सर्वांना सुख, समृद्धी, निरोगी व दीर्घायुष्य लाभो. तुमच्या मुलांची शैक्षणिक प्रगती होवो, त्यांना यश, कीर्ती व मानसन्मान प्राप्त होवो, हीच सदिच्छा. यानंतर सर्व माजी विद्यार्थी गुरुजींसोबत शिवनेरी - लेण्याद्री - ओझर या तीर्थक्षेत्र व ऐतिहासिक स्थळांना भेट देण्यासाठी गेले. सहलीसह हा स्नेहमेळावा आनंद, आठवणी आणि भावनांनी भरलेल्या वातावरणात संपन्न झाला. हा स्नेहमेळावा म्हणजे केवळ एक भेट नव्हे, तर गुरु-शिष्य नात्याचा सन्मान, मैत्रीची पुनर्भेट आणि संस्कारांची उजळणी करणारा सोहळा ठरला, अशी भावना अनिल तांबे यांनी व्यक्त केली.

# पुण्यात भाजपला जबर धक्का; चंद्रकांत पाटलांना नडलेला मोहरा राष्ट्रवादीत

पुणे : पुणे महानगरपालिका निवडणुक उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. भाजपचे माजी नगरसेवक आणि बाणेर-बालेवाडी प्रभागातील प्रभावशाली नेते अमोल बालवडकर यांनी पक्षाची साथ सोडून अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे. उमेदवारी नाकारल्याने नाराज झालेल्या बालवडकर यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ आपल्या मनगटावर बांधले असून, प्रभाग क्रमांक ९ मधून राष्ट्रवादीच्या तिकीटावर निवडणूक लढवणार आहे.

अमोल बालवडकर हे २०१७ ते २०२२ या काळात बाणेर-बालेवाडी प्रभागातून भाजपचे



नगरसेवक होते. त्यांनी कोथरूड विधानसभा मतदारसंघातूनही उमेदवारीची इच्छा व्यक्त केली होती, परंतु पक्षाने चंद्रकांत पाटील यांनाच पुन्हा उमेदवारी दिली. विधानसभा निवडणुकीत बालवडकर यांनी चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात छुपे युद्ध उघडले होते. देवेंद्र फडणवीस यांनी बालवडकर यांना माघार घेण्यासाठी शब्द दिला होता आणि पुढील काळात न्याय देऊ असे आश्वासन दिले होते.मात्र, महापालिका निवडणुकीत ऐनवेळी त्यांना तिकीट नाकारल्याने बालवडकर यांनी दगा फटका असा गंभीर आरोप करत पक्ष सोडला. बालवडकर म्हणाले, विधानसभेत एक लाखाच्या मताधिक्याने चंद्रकांत पाटील यांना निवडून आणले, तरीही पक्षाने माझ्याशी विश्वासघात केला. दोन दिवस अगोदर सांगितले असते तर मी ऐकले असते, पण शेवटच्या क्षणांपर्यंत झुलवले. हे नुकसान माझे नाही, पक्षाचे होणार आहे. अजितदादांनी मोठ्या मनाने उमेदवारी दिली, यात माझे काहीही नुकसान नाही.

**बालवडकर यांचा प्रवेश राष्ट्रवादीसाठी मोठा फायदा**

बालवडकर हे बाणेर-बालेवाडी, पाषाण, सूस या भागात भाजपचे मजबूत चेहरा मानले जात होते. त्यांच्या बाहेर पडण्यामुळे प्रभाग ९ मध्ये भाजपची आधीची ताकद जवळपास अर्धी होऊ शकते. विशेषतः पाषाण भागात राष्ट्रवादीचा प्रभाव असल्याने बालवडकर यांचा प्रवेश अजित पवार गटासाठी मोठा फायदा ठरू शकतो. चंद्रकांत पाटील यांच्या आक्रमक राजकारणामुळे हा प्रकार घडल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# पुण्यात शेवटच्या दिवशी अर्जांचा पाऊस; दिवसभरात २२९८ उमेदवारांचे अर्ज दाखल

पुणे । प्रतिनिधी

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आज इच्छुकांनी मोठी गर्दी केली होती. आज ३० डिसेंबर रोजी एकूण २२९८ नामनिर्देशन पत्रे दाखल झाली आहेत. निवडणुकीच्या रणधुमाळीत आतापर्यंत एकूण ३०४१ उमेदवारांनी आपले नशीब आजमावण्यासाठी अर्ज सादर केले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जाहीर झालेल्या या निवडणुकीसाठी पुणे महानगरपालिकेने ४१ प्रभागांतील १६५ जागांसाठी १५ निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालये स्थापन केली आहेत. आज दुपारपर्यंत उमेदवारांची मोठी रांग लागल्याने, दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयात उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांचे अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. दरम्यान, २३ डिसेंबर ते २९ डिसेंबर या कालावधीत एकूण ११,७५६ अर्ज विकले गेले होते, तर आज ३० डिसेंबर रोजी पुन्हा ४७० अर्जांची विक्री झाली. मागील सात दिवसांत ७४३ अर्ज दाखल झाले होते, मात्र शेवटच्या दिवशी ही संख्या प्रचंड वाढली.

# सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले, अभिनेत्री कविता लाड मेढेकर यांच्यासह शेकडो नाट्यरसिकांनी घेतली मतदानाची शपथ

पिंपरी । प्रतिनिधी

कलाकारांच्या शब्दांतून आणि रसिकांच्या सहभागातून मतदानाचे महत्त्व अधोरेखित करीत, लोकशाहीचा मूलमंत्र नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह येथे मतदान जनजागृती उपक्रम पार पडला. कला, संस्कृती आणि लोकशाही यांचा सुरेल संगम साधत, रंगमंचाच्या माध्यमातून दिलेला मतदानाचा संदेश नागरिकांच्या मनात रुजवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात सुप्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले आणि अभिनेत्री कविता मेढेकर यांनी देखील सहभागी होत आगामी महापालिका निवडणुकीत मतदान करण्याचे नागरिकांना आवाहन केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक जाहीर झाली असून, या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या



अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले नाट्यगृह येथे 'एका लग्नाची पुढची गोष्ट' या नाट्यप्रयोगाच्या वेळी मतदान जनजागृती उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमाच्या निमित्ताने रंगमंचावर केवळ मनोरंजनच नव्हे, तर लोकशाहीची जबाबदारीही अधोरेखित करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमामध्ये शेकडो नाट्यरसिकांनी मतदानाची शपथ घेत लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प व्यक्त केला. नाट्यप्रयोगासारख्या लोकप्रिय माध्यमातून मतदानाचा संदेश पोहोचविल्यामुळे नागरिकांमध्ये सकारात्मक संवाद निर्माण झाला असून, येणाऱ्या निवडणुकीत अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

मतदानाची शपथ

आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू अशी शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी शपथेचे वाचन केले.